
# चैतन्य लहरी

1990

मराठी आवृत्ति खंड 2, अंक 11 व 12.



"हुषारी हा तुमचा बौध्दिक दृष्टीकोन आहे आणि अबोधिता ही तुमची अंतर्गत गुणवत्ता आहे जी या सर्व सृष्टी व्यापी चैतन्याशी निगडीत आहे."

श्री. माताजी निर्मलादेवी.

श्री गणेश पूजा

ऑस्ट्रीया
दि 26 ऑगस्ट 1990

जसं श्रीगणेशाच्या आहे. त्याप्रमाणेच तुमच्या चेहऱ्यावर एक सुरेख तेज आहे. तुम्ही लहान, मोठे असा, वयोवृध्द असा, कांही फरक पडत नाही. श्री गणेशाच्या ओघामधून सर्व सौंदर्य आपल्याकडे येतं. जर ते समाधानांत असतील, तर दुस-या इतर देवतांबाबत काळजी करण्याचं कारण नाही, कारण सर्व देवतांची शक्ति श्री गणेश हेच आहेत. उपकुलगुरूप्रमाणे ते प्रत्येक चक्रावर बसले आहेत. त्यांच्या सहीशिवाय कुंडालिनी पलिकडे जाऊ शकत नाही कारण कुंडालिनी गौरी आहे. श्री गणेशाची कुमारी माता. पाश्चात्य समाजामध्ये ब-याचशा चुका झाल्या आहेत कारण श्री गणेशांकडे लक्ष देण्याची आपण काळजी घेतली नाही. ख्राइस्ट आले आणि त्याचा संदेश सर्व जगभर पसरला. ते त्या गोष्टींबाबत बोलले त्या गोष्टी ख्रिश्चन लोक आचारणात आणत नाहीत कारण लोकांनी जे कांही सुरू केलं ते सत्यावर आधारलेलं नाही. सत्य हे आहे की, श्री गणेशांनी ख्राइस्ट म्हणून जन्म घेतला. हे जर सत्य आहे तर श्री गणेशाच्या प्रकाशांत हे ख्राइस्टचं महान अवतरण समजावून घेतलं पाहिजे. त्यांनी लोकांना सांगितलं, "तुमचे डोळे व्याभिचारी असतां नयेत." खरं म्हणजे संताला" व्याभिचारी डोळे" म्हणजे काय ते ठाऊक नसतं. कारण तो फक्त पहातो. जसं ज्ञानेश्वरांनी अत्यंत सुरेखपणे सांगितले आहे की," निरंजन पाही" प्रतिक्रिया न येतां पहाणे, नुसतं पहाणं, पावित्र्याची ही गुणवत्ता ख्राइस्टने प्रकाशांत आणली होती. पण त्यापैकी कोणतेही गुण आपण आत्मसात केले नाहीत.

समजा, आज तुम्ही श्री गणेशांची पूजा करीत आहांत. तर तुम्ही त्यांची पूजा कां करीत आहात ? तुम्ही त्याची भक्ति करतां कारण तुमचा गणेश जागृत झाला आहे, अशासाठी कीं तुमच्या डोळ्यांमध्ये तुम्हाला पावित्र्याची जाणीव झाली पाहिजे नाहीतर तुम्ही दांभिक आहांत जर तुम्ही इथे बसला आहांत, श्री गणेशाची भक्ति करीत आहात आणि श्री गणेशाप्रमाणे तुमच्या उन्नतीकडे तुमचं लक्ष देण्याचा तुम्ही प्रयत्न करीत नसाल, तर ते निरर्थक आहे.

तो शाश्वत बालक आहे. त्याला अहंकार नाही. त्याला कोणत्याही प्रकारच्या रितीभातीरूढी आदींचे बंधन नाही. आपल्याला आपल्या आईचे शाश्वत बालक व्हायला हवे. त्या स्थितीला पोहोचण्यासाठी आपल्याला जे केले पाहिजे ते हे कीं आपली कुंडालिनी वर करायची. तिला स्थित करायची. ध्यान करायचे, आपले चित्त जास्त करून आंत ठेवायचे. आणि प्रतिक्रिया ठेवायची नाही.

प्रतिक्रिया नाही, याचा अर्थ नुसतं पहाणं. जेंव्हा विचार न करतां तुम्ही एखादी गोष्ट पहाता, त्यावेळी सत्य जे खरं तर काव्य असतं ते बाहेर येतं. त्यामुळेच साधारण व्यक्तिपेक्षां कवी खूप जास्त बघतो. अंतर्यामींचं सौंदर्य तुमची दृष्टी पार करूं लागतं तुम्ही ते बघू लागतां. मुलांना तुम्ही बघता, त्याचं मूळ काहीही असूं दे, कोणताही देश असूं दे, सर्वसाधारणपणे ती खूप सुरेख असतात. एकदां जपानमध्ये मी एका पवित्र स्थानी गेले होते. तिथे काही पाश्चात्य स्त्रीयांना तिथे जाऊ नका असे मला सांगितले, "तिथे भयंकर आहे, जपानी मुलं तुम्हाला चेटकीण म्हणतील ". जेंव्हा मी तिथे गेले तेंव्हा ती सगळी तिथे धांवत आली आणि मला जाऊं देईनात, माझ्या साडीचे, माझ्या हातांचे मुके घेत बसली. मला आश्चर्य वाटलं की, कसं

काय, माझ्याशी, माझ्या मुलींशी, ती इतकी गोड वागत होती आणि त्यांना त्यांनी "चेटकीणी" म्हटलं. त्यांच्या आयांनादेखील आश्चर्य वाटलं कारण सामान्यत: सर्व परदेशी स्त्रीयांना ते चेटकीणी आणि पुरूषांना राक्षस म्हणत. नंतर माझ्या लक्षांत आलं की, त्यांच्यामध्ये त्यांचा गणेश जागृत झाला. तुम्ही जेंव्हा जन्मतो त्यावेळी प्रत्येकाचा गणेश जागृत होतो. सर्व प्राण्यांचा गणेश जसाच तसा असतो. मुख्यत्वेकरून पक्ष्यांचा सैबेरिया ते ऑस्ट्रेलिया पक्षी उडूं शकतात. ही दिशेची जाणीव श्री गणेशाकडून येते. ते त्यांच्यामधील मॅग्नेट - लोहचुंबक आहे. हे लोहचुंबक जे आपल्यामध्ये असतं, ते निष्पाप लोकांना आकर्षित करतं आणि लबाड, भयंकर चेटकीणी राक्षस यांसारख्या लोकांचे अपकर्षण करतं. त्यांना दूर लोटतं. या लोहचुंबकामध्ये दोन्ही गुणधर्म असतात. जे बरोबर नसतात त्यांना ते दूर लोटतं आणि निष्पाप लोकांना आकर्षित करतं म्हणून सहजयोगामध्ये आपण बघतो की काही लोकांना आपण कितीही प्रयत्न केला तरी सहन करूं शकत नाही. कारण आहे गणेश !

पाश्चात्य देशांमध्ये श्री गणेशाबाबत विकृतिंबद्दल पुष्कळ जास्त बोलणं झाली आहे. ते टि.व्ही.वर बोलतात. इथे,तिथे, प्रत्येक ठिकाणी खूप लहान मुलं श्री गणेशाच्या प्रश्नामुळे त्रास भोगीत असतात, आसमंत या प्रश्नांनी भरून गेला असल्याने त्यांना हा त्रास भोगावा लागतो. सहजयोगीत देखील काहीं लोकं अशी आहेत जी फाजील चिकित्सा करीत असतात, त्यांना गणेशाचे प्रश्न आहेत आणि काहीं आहेत, जे या लोकांना पाठिंबा देतात. या प्रकारची सहानुभूती भयावह आहे कारण ती जी व्यक्ति या प्रश्नापलिकडे जाऊ शकत नाही, त्या व्यक्तिचा नाश करते आणि हळूहळू तुम्हीसुध्दां या त्याच्या बाधा उचलून घेता. श्री गणेशाचं ध्यान करा. पृथ्वी मातेवर बसा, गणेश अथर्वशीर्ष म्हणा. तुमचे प्रश्न दूर होतील. अशा प्रश्नांबाबत सहानुभूती दाखवणे म्हणजेच सिंपथी. सिम म्हणजे वाटून घेणे, पथी म्हणजे पॅथोस - करूणा उत्पन्न करणारी गोष्ट. तुम्ही स्वत: त्या व्यक्तिचे सर्व प्रश्न वाटून घेता. चुकीच्या गोष्टीला कधीही पाठिंबा देऊ नका. तुम्हांला त्या व्यक्तिविषयी खरोखर प्रेम असेल. त्याची कदर करीत असाल तर त्याची काय चूक आहे हे त्याला तुम्ही सांगितले पाहिजे.

शिवाय सहजयोगामध्ये, मी पाहिलं, सत्तर वर्षांची लोकं ज्यांना लग्न करायचं आहे ! काहीं झालं तरी सहजयोगामध्ये एकाकीपण शक्य नाही. इतके सहजयोगी तुमच्याकडे आहेत. मी कधीही एकटी नसते. तुम्ही माझ्याबरोबर नसाल तर माझं कुटुंब माझ्याबरोबर असतं. खरं तर, मी एकटी असते, तेंव्हा मी एकटी नसते. जेंव्हा मी एकटी असते त्यावेळी मी स्वत: अत्यंत आनंदात रममाण होते. कारण अजूनपर्यंत काय साध्य केलं ते मला बघायला वेळ मिळतो.

हे सर्व लोक जे त्यांच्या मूलाधाराच्या बाधा समजावून सांगत आहेत त्यांना कळलं पाहिजे की नरकांत जाण्यासाठी अचूक प्रमाणपत्र आहे. कारण मुलाधारामधूनच सर्व प्रकारचे रोग उद्भवतात जे डॉक्टरांच्या म्हणण्याप्रमाणे असाध्य असतात. मल्टीपल स्क्लेरॉसिस पासून स्नायूच्या अपंगता पर्यंतचे सारे रोग. कॅन्सरसुध्दां मुलाधाराच्या बाधांपासून सुरूं होऊ शकतो. पाश्चात्य देशात इतर देशांपेक्षा जास्त कॅन्सर का आहे ? स्क्रिझोफेनिया हा रोग मुलाधाराच्या बाधांपासून होऊ शकतो. एडस् सुध्दा दुसरं काहीं नाही पण

मुलाधाराची बाधा आहे. तरी सुध्दा तुम्हांला जर हौतात्म्य दाखवायचं असेल की आम्ही आमच्या मृत्यूकडे चालणारे एडवुचे शिपाई आहोत तर अशा मूर्ख लोकांचं आपण काय करू शकणार ? मूर्खपणासुध्दां मुलाधारामधूनच येतो. कारण श्री गणेश हा सुज्ञतेचा दाता आहे. तुम्हांला सुज्ञता कशी मिळते ? फक्त श्री गणेशाची जागृती करूनच. लोक अनेक प्रकारच्या, विश्वास न बसणा-या मूर्खपणाच्या गोष्टी करतात. उदा: अलिकडेच भारतामध्ये मी मोठा हात असणा-या बायकांसाठी मोठया बांगडयांबाबत विचारणा केली. त्यांनी सांगितलं हल्ली सगळया मोठया बांगडया अमेरिकेला जातात. कारण अमेरिकन पुरूषांनी बांगडया वापरण्याचं ठरवलं आहे. भारतामध्ये तुम्ही पुरूषाला बांगडया दिल्या तर तो पुरूष नाही, असा अर्थ होतो. हा सर्व मूर्खपणा उद्‌भवतो कारण त्यांचं मुलाधार व्यवस्थित नाही. उदा: भारतामध्ये आम्ही सगळया साडया नेसतो. त्याचं पहिलं कारण म्हणजे साडया तयार करण्याच्या ग्रामोद्योगाला पाठिंबा मिळतो. दुसरं तर आमची शरीरं आम्ही अशा प्रकारे झाकूं शकतो की उघडी पडत नाहीत. तिसरी गोष्ट म्हणजे मुलांना दूध पाजण्याच्यावेळी ते सोपं पडतं. तर त्याची अशी अनेक अंगं आहेत. पण तर्कशुध्दरित्या कोणी विचार करीत नाही. त्यांना वाटतं ते फार व्यवहारी आहे आणि परंपरागत चालत आलेलं आहे. समजा, तुम्ही साडया वापरण्याचं सोडून दिलं, दुसरं काही वापरू लागला तर कोणीही त्याचा स्वीकार करणार नाही. कारण साडया जास्त मोहक दिसतात. तुम्हाला जास्त स्त्री सारखं अभिव्यक्त करतात.

खेडेगावामध्ये तर ते कधीच बदलणार नाहीत. फॅशन म्हणून काहीं तिथे काही चालणार नाही कारण परंपरागतरित्या त्यांना योग्य अशा सुज्ञतेच्या स्थितीला ते पोहोचले आहेत जी त्यांना योग्य प्रकारे शोभते. पाश्चात्य लोकांनी त्यांची सुज्ञता हरवली आहे. त्यामुळें तिथून भारतामध्ये येणारं काहीही अर्थपूर्ण नाही त्यांच्यामध्ये जे काहीं अर्थपूर्ण आहे ते सुध्दा जात चाललं आहे. एका प्रकारच्या गोंगाट करणा-या पॉप-रॉक संगीताच्या, जे कानांमध्ये घुसून तुम्हांला बहिरं करतं- अशा ठिकाणी हजारो जमतील. या सर्व गोष्टींमध्ये काही शहाणपण नाही. त्यांना पूर्ण वेळ काहीतरी संवेदना हव्या असतात. लोक इथे स्कीइंगसाठी येतात असं मला सांगण्यात आलं आणि काही लोकांना पॅराशूट घेऊन उडया मारतांना मी पाहिलं. भारतीयाला समज आहे की, इतर कोणत्याही गोष्टींपेक्षा माझे शरीर जास्त महत्त्वाचे आहे. संवेदना कशासाठी हवी ? किती तरी लोकांनी त्यांचे हातपाय, आयुष्य गमावलं आहे. ज्या लोकांना सुज्ञता नाही त्यांना या संवेदनेचं मोठं आकर्षण असतं. सुज्ञतेला याचं आकर्षण वाटत नाही. सुज्ञ लोक अशा मूर्खपणाच्या गोष्टी करायला धजत नाहीत.

श्री गणेश बालक आहेत पण सुज्ञपणाचे दाते आहेत. त्यामुळे आपण म्हणू शकतो की, आपली मुले सुज्ञता देणारी आहेत, जर आपण त्यांना शहाणपणाच्या धाग्यावर ठेवलं तर. किती शहाणपणाच्या गोष्टी बोलतात ती। काही जणं मला सगळं सांगतात, तुमच्याबद्दल, तुम्ही काय करण्याच्या मागे आहांत, त्याबद्दल ती मला पूर्णपणे विश्वासांत घेतात मुलांशिवाय जग म्हणजे फुलांविना वाळवंटासारखे भासेल. श्री गणेशानी तुम्हाला निर्माण केलं आहे, त्यांच्यामुळे तुम्ही जन्मला. तुम्ही तुमच्या आईच्या गर्भाशयामध्ये होतां त्यावेळी तुमची काळजी घेणारे तेच होते. योग्य वेळेला तुमचा जन्म व्हावा याविषयी त्यांनीच काळजी घेतली. तुमचं पोषण, अर्भकावस्थेतील वाढ, त्याचा मेंदू सा-यावर लक्ष ठेवणारे तेच होते. एक साधा खेडूत. अत्यंत व्यवहारी आणि सुज्ञ असतो. एकदां एक साधा खेडूत काही भपकेबाज मुलांबरोबर ज्यांना वाटत होतं की ते फार हुशार आहेत - प्रवास करीत होता. या खेडूताला, चिडविण्याचा ते प्रयत्न करीत होते. म्हणून एका

मुलाने त्याला प्रश्न विचारला, " पाव पौंडाला जर लोणी विकलं जात आहे तर पुढच्या स्टेशनवर अंड्याची किंमत काय असेल, जर तुला अंडयांची किंमत सांगता येत नसेल तर कमीत कमी माझं वय तुम्ही सांगू शकता ". तो शेतकरी म्हणाला, " तूं बावीस वर्षांचा असशील " तुम्हांला कसं कळलं ? " मुलाने विचारले, शेतकऱ्याने उत्तर दिलं, " मला एक भाऊ आहे अकरा वर्षांचा तो अर्धवट आहे पण तूं तर पूर्ण वेडा आहेस !"

ही सगळी हुशारी आणि चलाखी अबोधितेकडे आलं की संपते. ब-याच लोकांना वाटतं की आपली अबोधिता हरवली आहे. ती तुमच्याकडे असणारी चिरंतन गुणवत्ता आहे. तुमची अबोधिता कधी हरवत नाही. कदाचित जसे ढग पूर्ण आकाश झाकून टाकतात. त्याप्रमाणे तुमचा अहंकार, रूढी, चुका तिला झाकाळतात पण ती सदैव तिथे असेल. फक्त गोष्ट ही की, तुम्ही तिचा आदर केला पाहिजे आणि अशा त-हेने वागलं पाहिजे. ज्यामुळे तुमच्या अबोधितेचा तुम्ही मान राखाल. तुमची अबोधिता हीच शक्ति आहे. ती तुम्हांला नक्कीच ती सूज्ञता देइल ज्यायोगे काहीही अडचण न येता तुम्ही सर्व प्रश्न सोडवू शकाल.

गहनतेमध्ये जर तुम्ही बघाल, तर ते आदिशक्तिचे बालक आहेत. तिने त्यांना ऑंकारापासून बनविले. ऑंकार हा एक लोगो ठला आहे. हा पहिला ध्वनी आहे. जिथे सदाशिव आणि आदिशक्ति निर्मितीसाठी वेगळे झाले. हा ध्वनी ऑंकार म्हणून वापरला जातो जी व्हायब्रेशन्स आहेत. ज्यामध्ये प्रकाश आहे. त्याच्यामध्ये फक्त उजव्या बाजूला सर्व पंचमहाभूतांना कारणीभूत होणारे सर्व आहेत. डाव्या बाजूला भावनांची शक्ति आहे. मध्यभागी तुमच्या उन्नतिची शक्ति आहे. ते फार शक्तिमान दैवत आहे आणि फार खेळकर आहे. मुलं क्वचितच क्रूर असतात. ते क्रूर नाहीत पण त्यांच्या आईविरूध्द काहीं केलं तर ते बेफाम होतात आणि शिक्षा करतात. अशा प्रकारे दैवी न्यायनिवाडा लोकांप्रत आणला जातो.

जर आपण श्री गणेशांना शरणागत झालो तर ते आपले रक्षण करतात. आपल्याला सूज्ञता देतात, योग्य समजणूक आणि आईबरोबरच्या वागणूकीचे नियम दाखवितात. त्यांना त्यांच्या आईशिवाय दुसरे दैवत माहीत नसते.. ती सर्वांत शक्तिमान दैवत आहे हे त्यांना माहित आहे. ती त्यांची सूज्ञता आहे. जेंव्हा तुम्ही त्यांची पूजा करता तेंव्हा तुम्ही ती आत्मसात केली पाहिजे.

पाश्चात्य देशांतील काही लोक, इतर लोकांच्या वागणूकीची री ओढून, चुकीच्या कल्पनांमध्ये गुंतून, मागे पडण्यात, ज्यांमुळे त्यांना खरोखर सत्यापासून दूर ठेवलं गेलं आहे. - त्यांसाठी अगदी आतूर आहेत. परमेश्वराच्या कृपेने तुम्ही त्याच्यातून बाहेर आलांत. खरं म्हणजे पाश्चात्य समाज कुठल्या नरकांत पडला आहे ते तुम्ही पहा. समजून घेण्याचा प्रयत्न करा आणि तुम्ही पूर्णपणे दुस-या स्थितीमध्ये आहात त्याचा आनंद लुटण्याचा प्रयत्न करा. पण तरीही तुमच्यामध्ये सुध्दा काही असतील ते अजूनही टांगलेले असतील. त्यांना वर ओढण्याचा प्रयत्न करा. त्यांना सहानुभूती दाखवून त्यांना आत ढकलूं नका. तुम्ही जर त्यांना सहानुभूती दाखवलीत तर त्यांच्याबरोबर तुम्ही सुध्दा खाली जाल. तुम्ही त्यांना त्यांच्या बाधा सांगणं त्यांना दुःखदायक असेल, पण हरकत नाही. ते वाचवले जातील. तुम्ही इथे रक्षणकर्ते म्हणून आला आहात आणि तुमच्याकडे श्री गणेशाची शक्ति आहे जी वापरली पाहिजे.

आजची पूजा मुख्यत्वेकरून हृदयामध्ये प्रार्थना करून केली पाहिजे की श्री गणेशा, आपण कृपावंत, दयाळू, क्षमाशील होऊन आमच्यामध्ये आपला अविष्कार करा. सर्व दांभीक गोष्टी, सर्व कंडीशनिंग्ज (रीतीभाती आदी ) सर्व चुकीच्या कल्पना आम्ही कंठलेलं सर्व चुकीचं आयुष्य तुरळक हवेप्रमाणे विरून जाऊ दे. चंद्रप्रकाशासारख्या सुंदर अशा अबोधितेच्या शीतल गुणांचे प्रकटीकरण आमच्यामधून होऊ दे. या गुणांना आम्ही अविष्कृत करावं. आज आपण ऑस्ट्रीयामध्ये आहोत, ज्याला मी दैवी शास्त्रांचा देश म्हणते. हा फार चांगला देश आहे . कारण इथे मूलगामीपणा नाही. आपल्या सर्वांना उघडया डोळ्यांनी ईश्वरीकृपा पडत असताना दिसत होती. पाऊस नव्हता पण नुसते आशिर्वाद दिसत होते.

अबोधित लोक बनवण्याचा प्रयत्न करा आपण हुशार लोक असण्याची गरज नाही. हुशारी हा तुमचा बौध्दीक दृष्टीकोन आहे आणि अबोधिता ही तुमची अंतर्गत गुणवत्ता आहे जी या सर्व सृष्टीव्यापी चैतन्याशी निगडीत आहे.

ईश्वर तुम्हाला आशिर्वादीत करो.

19 ऑगस्ट 1990.

ही पूजा आम्ही मुद्दाम इंग्लंडमध्ये ठेवली म्हणजे जास्त लोकांना येऊन श्रीकृष्णाची जागृति कार्यान्वित करता येईल. अनेक वर्षापूर्वी गीता लिहिली गेली होती ती वेगवेगळया भाषांमध्ये रूपांतरीत झाली आहे. त्यावर अनेक भाष्ये व टिका आहेत. ह्या गीतेच्या हेळसांडीमुळे अनेक लोक रसातळाला गेले आहेत. आजसुध्दा खूप लोक ती विकत आहेत आणि " जोहोबाज विटनेस " ने बायबलला ज्याप्रमाणे केलं तसं पुस्तकी ज्ञान बनवीत आहेत. अशा प्रकारे श्रीकृष्णाच्या गीतेची ती मार्केटिंगची कंपनी करीत आहेत. ख-या उन्नतीच्या धर्मविरूध्द अनेक भयानक गोष्टी आल्या आहेत. आणि श्रीकृष्णाने म्हटलं आहे, की जेंव्हा धर्माची अधोगती होइल, हे आज पुरेपूर सत्य आहे, आणि जेंव्हा संतांचा छळ होइल, त्यावेळी मी संतांचे रक्षण करायला आणि सर्व निगेटिव्ह फोर्सेस आणि राक्षस यांना नष्ट करायला या पृथ्वीवर येइन. आपल्यामधील श्रीकृष्णाची जागृति ही फार महत्वाची आहे, आपण उठून आपल्यामधील त्याच्या गुणांचे प्रकटीकरण करणे महत्वाचे आहे. मगच शक्त्या काम करतील.

बाल्यावस्थेत कृष्णाने खूप राक्षसांना मारले. त्यानंतर गोपी, गोप यांबरोबर ते खेळले फक्त त्यांच्या कुंडालिनीला उघडण्यासाठी श्री राधेची शक्ति त्यांच्यामधून वहावी यासाठी त्यांनी रास खेळली. त्यांचे मामा राजा कंस, जो मुख्य राक्षस होता. त्याला त्यांनी मारले. त्याचा अर्थ तुमचे नातेवाईक राक्षस किंवा सैतान असतील तर त्यांना ते तुमचे नातेवाईक आहेत म्हणून त्यांना वाचविण्याचा प्रयत्न करता नये, आणि त्यांचं दुष्टत्व सहजयोगाबद्दल करता नये. पूर्ण जगात अशी कोणतीही चळवळ नाही. जी लोकांना नुसती सहजयोगातून बाहेर जायला देते. इतकेच नव्हे तर त्यांना बाहेर ढकलते. कारण सहजयोग दैवी शक्तिने बांधला गेला आहे. आणि या नियमांनुसार त्याला वागले पाहिजे. श्रीकृष्णाची पध्दत अशी होती की, "त्यांना बाहेर टाकण्याची काय गरज आहे. नुसतं मारून टाका. म्हणून त्याने स्वत:च्या मामाला मारलं. पण सहजयोगांमध्ये आम्ही अशा सैतानी पध्दतीच्या लोकांनासुध्दा संधी देतो, जे आमच्या वाढीला घातक असतात किंवा अध्यात्म आणि देव यांच्या विरोधात असतात. त्यांना स्वत:ला टांगण्यासाठी मोठा दोर देतो, ती या अवताराची आईची बाजू आहे. पण श्रीकृष्णाची बाजू जलद गतीची आहे. श्रीकृष्ण जास्त वेळांसाठी आला नाही. त्या थोडक्या वेळामध्ये त्याने अनेक राक्षसांना मारले. पांडवांच्या बाजूने ते लढले, कौरवांना त्यांनी मारलं नाही असं त्यांनी म्हटलं पण त्यांनीच मारलं.

श्रीकृष्णाची पध्दत एका अंगाला मधासारखी गोड आहे. त्यामुळे ज्या लोकांना त्यांचे आशिर्वाद हवे असतात. ते त्यांना माधव म्हणून संबोधतात. पण दुष्ट लोकांसाठी ते एक सर्वात जास्त धोकादायक व्यक्तित्व आहे. अर्थात शिवसुध्दा तेच करतात. शिव आणि देवीनेसुध्दा अनेक राक्षसांना ठार केले आहे. तीने चर्चा, वादविवाद, लढाया यांत भाग घेतला. पण कृष्णाने कधीच वादविवाद केला नाही. त्यांची कशी एकामागून एक वाट लावायची ते त्यांना माहित होतं. एक दुष्ट राक्षस होता जो लोकांचा छळ करीत होता. आणि श्रीकृष्ण त्याच्याबरोबर लढाईत गुंतला होता म्हणून श्री कृष्णांनी एक क्लुप्ती केली. श्रीकृष्णाने एका गुहेत प्रवेश केला जिथे एक तपस्वी झोपला होता. या तपस्याने शिवाकडून एक वर मिळवला होता की जो कोणी त्याची झोपमोड करील तो राख होऊन जाइल. श्रीकृष्णांनी स्वत:ची शाल काढून घेतली. हळूवारपणे

त्या तपस्यावर आच्छादून टाकली आणि स्वतः लपून बसले. राक्षसाने गुहेमध्ये प्रवेश केला आणि झोपलेल्या तपस्याला श्रीकृष्ण समजून लाथ मारली. तपस्वी उठला आणि आपला तिसरा डोळा उघडून त्याने त्याच्याकडे पाहिलं. राक्षस जळून भस्म झाला. ही क्लृप्ती होती.

एकदा कंसाने एक स्त्री जी राक्षसीण होती ती बाळकृष्णाला ठार मारण्यासाठी पाठविली होती. तीने तिच्या स्तनामध्ये वीष घातलं होतं. आणि श्रीकृष्णांना ती स्तनपान देऊ लागली. जेंव्हा ते चोखूं लागले त्यावेळी तिचे स्तन जास्त वाढूं लागले आणि ती मेली. दुस-यावेळी त्यांना माहित होतं दोन राक्षस दोन मोठया वृक्षांचं रूप घेऊन आले होते. त्यांनी लोणी चोरल्यामुळे त्यांची आई त्यांच्यावर रागवली होती. आणि त्यांना मुसळाला बांधलं होतं. ती गेल्यावर श्रीकृष्ण त्यांच्या छोटया पावलांनी मुसळासकट चालत गेले आणि त्याने दोन्ही वृक्षांना मारले. वृक्ष खाली पडले आणि राक्षस मरण पावले.

श्रीकृष्णांना इतकी माहिती आहे आणि ते हुशार आहेत. कारण ते मेंदू आहेत. ते विराट आहेत. त्यांचं सारं प्रेम, करूणा, आणि सौंदर्य हे त्यांच्या गोप आणि गोपींसाठी होतं. राजा म्हणून त्यांचे जीवन समजण्यासाठी अनाकलनीय होतं. पण सहजयोगी ते समजू शकतील. जेंव्हा ते राजा झाले तेंव्हा त्यांना बायका असणं प्राप्त होतं म्हणून त्यांनी पाच बायकांशी लग्न केलं. पाच कां ? कारण ती पाच मूलतत्वं होती. पांच महाभूतांची कारणं होती. त्यांना 16,000 शक्त्या होत्या. माणूस नव्वद वर्षांचा असेल, त्याला त्याच्या आसपास कोणी बाई ठेवायची असेल तर तो वाईट मनुष्य आहे असे ते म्हणतील. भारतामध्ये माणूस त्याच्या धडग्यांत उडी घेत असेल पण एका बाईने त्याला मदत केली. तर ते म्हणतील त्याचे तिच्याशी वाईट संबंध होते. इतक्या वाईट परिस्थितीमध्ये त्यांना नाव खराब करायचं नव्हतं. त्यांनी विचार केला, शक्त्यांचं काय करायचं ? त्यांना स्त्रीया म्हणून अवतार घ्यावा लागेल म्हणून त्यांनी काय केलं. या स्त्रीया 16,000 राजकन्या झाल्या आणि एका राजाने त्या सर्वांना पकडलं जेंव्हा हा माणूस त्यांचा दुरूपयोग करणार होता. श्री कृष्णांनी त्याच्या राज्यावर चाल केली आणि सर्व 16,000 राजकन्यांना सोडविले. श्रीकृष्णांनी त्यांना स्वतः बरोबर आणलं आणि त्यांच्याशी लग्न केलं. पण लग्न करण्याचा प्रश्न येतो कुठे. कारण त्या त्यांच्याच शक्त्या होत्या. श्रीकृष्णांनी त्यांच्या शक्त्या अनेक गोष्टींची निर्मिती करण्यासाठी वापरल्या . जसे ते आले नसते तर अध्यात्मिक जीवनाचं महत्व आपल्याला कळलं नसतं. संत आणि द्रष्टे यांच्याकडून अध्यात्मिक जीवनाविषयी जरी लोकांना माहिती होती तरी कोणत्याही अवतरण याबाबतीत बोललं नव्हते. श्रीकृष्ण हे पहिले होते, जे अध्यात्मिक जीवनाबद्दल बोलले आणि ते सुध्दा फक्त अर्जुनाशी. वामन, परशुराम वगैरे आपल्याकडे होते. पण त्यांपैकी कोणी अध्यात्मिक जीवनाबद्दल बोललं नाही. त्यावेळची स्थिती अशी होती की लोक तयार नव्हते. जास्त सहजयोगी नाहीत म्हणून किंवा फार अडथळे आहेत, अडचणी आहेत म्हणून ज्या सहजयोग्यांना हताश वाटतं, त्यांना ठाऊक असलं पाहिजे की श्रीकृष्णाच्या वेळी अध्यात्मिकतेबद्दल ते फक्त एकाच शक्तिशी बोलायला धजूं शकत होते.

श्रीकृष्णानंतर ख्राइस्टने पुढाकार घेतला. आणि अध्यात्मिकतेबद्दल बोलू लागले. अब्राहम आणि मोझेससुध्दा याबाबतीत बोलले नाहीत. ख्राइस्ट येइपर्यंत तुम्हाला परत जन्म घ्यावा लागतो. याबाबत कोणीच

बोलले नाही. फक्त श्रीकृष्णाने याबाबतीत सांगितलं श्रीरामांना त्यांच्या गुरूने कुंडालिनीबद्दल शिकवलं होते पण ते गुप्त शास्त्र होतं, जे फार थोडी लोकं, ज्यांना साक्षात्कार मिळाला होता, ते आचारणात आणीत होते. त्याच्याशी तुलना करता, कल्पना करा, आपल्यापैकी किंवा जणांना अध्यात्मिकतेबद्दल माहिती आहे. आपल्याला अध्यात्मिकतेची नुसती जाणीव होत नाही तर आपण अध्यात्मिक झालो आहोत. जर संधीचा नियम लागू केला, तर मला नाही वाटत, ख्रिस्तानंतरसुध्दा इतके लोक आले असते. कृष्णाच्या वेळेपासून ख्राइस्टच्या वेळेपर्यंत सहा हजार वर्षे झाली आणि सहा हजार वर्षांमध्ये कृष्णाला फक्त एक शिष्य मिळाला. ख्राइस्टचे बारा होते आपल्याला समजलं पाहिजे की आता हा नवा स्फोट आहे म्हणून मी त्याला बहराचा काल म्हणते. आपण खात्रीपूर्वक अध्यात्मिक लोक आहोत. आपल्याला अध्यात्मिकता आहे. दैवी शक्ति कार्यान्वित झाली आहे ज्यायोगे कलीयुग संपत आलं आहे आणि आता कृतयुग आहे.

आपल्याला इतके सहजयोगी देण्याला कृतयुगाचं कार्य जबाबदार आहे. कृत युग म्हणजे तो काल जेंव्हा हे ब्रम्हचैतन्य कार्यान्वित झालं. याआधी कोणालाही शीतल व्हायब्रेशन्सची जाणवी झाली नव्हती. त्यांना थंडपणा जाणवला पण व्हायब्रेशन्स जाणवली नव्हती. मुख्य म्हणजे शारिरीक शास्त्रां बरोबर त्यांचा संबंध कधीच जोडला गेला नव्हता. मी म्हटलं पाहिजे, सहजयोगाचं कर्तृत्व विलक्षण आहे. याशिवाय युगांपासून कार्यान्वित असलेल्या उत्क्रांतिचे आभार मानले पाहिजेत की, ब्रम्हचैतन्य लोखंडासारखे या पृथ्वीवर कार्यान्वित झाले आहे. पण कोणी म्हणू शकेल की आई तुम्ही आधी का आला नाही ? ती वेळ नव्हती. आता सुध्दा पाश्चात्य देशात समंजस लोकांची टक्केवारी बरची कमी दिसते. आपल्याकडे हे विनाश चालू आहेत. हरकत नाही. आता सहजयोगाची भरभराट होइल, त्याला बहर येइल, आणि लोकांनी काही सांगितलं तरी तुम्ही काळजी करता नये. कारण एकदा का त्यांना आनंद, सुख, सत्य मिळालं का जर ते प्रामाणिक असले तर ते सहजयोग सोडणार नाहीत. समजा पती पत्नी आहेत आणि पत्नी ही भयंकर स्त्री आहे, किंवा उलट, आणि ती नव-याला सहजयोगांत येण्याला अडथळा घालीत असेल, तर पती म्हणेल, तूं सोडून जा पण मला अमृत, सौंदर्य आणि आनंद मिळाला आहे. कल्पना करा, श्रीकृष्ण त्यांच्या विराट स्वरूपामध्ये रणांगणावर अवतीर्ण झाले. पण त्यांनी दुस-या कोणालाही दाखविले नाही. पण आता तुमच्याकडे पहायला फोटो आहेत. जरी तुम्हाला तुमच्या डोळ्यांनी दिसलं नाही, तरी काही जणांना कांही गोष्ट दिसतात त्यांना त्या जाणवत आहेत. तुम्ही विकार पावत आहात, तुमची त्यामध्ये वाढ होते आहे. हे नवं राज्य आहे. श्रीकृष्णांनी याबद्दल बोलणं सुरू केलं होतं. नाथपंथीयांचा अध्यात्मिकतेमध्ये विश्वास होता, पण ज्ञानेश्वरांच्या वेळेपर्यंत ते त्याबद्दल बोलले नाहीत. त्या आधी हे गुपीत होतं, त्यानंतर महंमदसाहेब, नानक शिरडी साईनाथ आणि काही सुफींनी अध्यात्मिकतेबद्दल बोलणं चालू केलं.

ऐतिहासिकरित्या आपल्याला श्रीकृष्णांचे खूप आभार मानले पाहिजेत. कारण ते आहेत, ज्यांनी पहिली गांठ सोडली. त्यामुळे तिला विष्णुग्रंथी असे म्हटले आहे. विष्णूग्रंथीचं हे ज्ञान हळूहळू कळावं असे श्री कृष्णांना वाटत होतं. त्यामुळे गीतेमध्ये सरळ सरळ नाही पण चातुर्याने सगळे दाखविलं. गीतेशी पहिला हात घालणारे ज्ञानदेव होते. त्यांनी सहाव्या अध्यायामध्ये कुंडालिनीविषयी सांगितले पण ते त्यांनी बंद केलं. कारण त्यांना ते सांगता येइना. लोकांना कुंडालिनीबद्दल माहित होतं पण त्याविषयी वाचायचं नाही. कारण ते फार चुकीचं आहे वगैरे सांगण्यात आले. त्यामुळे पाश्चात्य जगात अध्यात्म अगदी अज्ञात राहिलं. जरी ख्राइस्ट आले तरी त्यांना फक्त ते क्रॉसवर चढवीत राहिले. ख्रिश्चनिटीमध्ये तुम्ही कांहीही गुन्हा केला तरीही तुम्ही

ख्रिश्चन असता. एक खुनी व्यक्ति मला माहित आहे. त्याला जेंव्हा कोर्टामध्ये नेलं तेव्हा तिथे विचारलं," " तुम्ही कोण आहात ?" तो म्हणाला, " मी ख्रिश्चन आहे." मग त्यांनी त्याला बायबल दिले. बायबलवर हात ठेवून तो ख्रिश्चन आहे, हे म्हणायला सांगितले तो म्हणाला मी ख्रिश्चन आहे. त्यांनी कां नाही विचारलं की, " मग कां ठार केलंस ? " दाऊ, शॅल नॉट किल." हे धर्मसुध्दा ज्यांची स्थापना झाली, त्यांचे काही नियम, अटी, वगैरे नव्हत्या की, कोणत्याही व्यक्तिने जर असं काही केलं तर तो चर्चमधून बाहेर टाकला जाईल किंवा तो ख्रिश्चन असणं थांबेल. याउलट, तुम्हाला आश्चर्य वाटेल, जेंव्हा माझ्या वडिलांनी ब्रिटीशांशी लढण्यासाठी भारतामध्ये कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला त्यावेळी त्यांनी त्यांना चर्चमधून बाहेर काढण्यात आलं. कारण मिशनरींच्या मते ख्राइस्ट इंग्लंडमध्ये जन्मला होता ! तो इंग्लीशमन असायला हवा.

या सर्व देव धर्म, अध्यात्मविषयक कल्पना , ज्या फार मूर्खपणाच्या होत्या त्या, या संघटित धर्मांना, प्रचलित, उपयोगी आणि सोईस्कर झाल्या. हिंदू धर्माविषयी एक चांगली गोष्ट आहे ती म्हणजे त्यात संघटना अशी काही नाही. ते बुध्द, जैन, ख्रिश्चन अथेइस्ट, ख्रिश्चन असू शकतात पण ते हिंदू सुध्दा असू शकतात. कारण ते संघटीत नाहीत. त्यांच्यावर काही निर्बंध नाहीत. तसं असूनसुध्दा हिंदू हे फार सहनशील लोक आहेत कारण जबाबदारी त्यांच्यावर आहे, संघटनेवर नाही. तुम्ही जर कोणाचा खून केलात तर त्याबद्दल तुम्हाला पुजायला कबूली द्यायला नको, पण स्वतःला द्यायला पाहिजे. आणि पूर्ण वेळ स्वतःला तोंड दिले पाहिजे. कितीतरी घाणेरडया गोष्टी धर्मामध्ये सरपटत आल्या. जशा जाती भाती ज्या श्रीकृष्णाच्या अगदी विरोधात आहेत. त्यांना श्रीकृष्णांचं नांव घ्यायचा अधिकार नाही आणि या सर्व निरर्थक गोष्टी करायच्या कारण श्रीकृष्णांनी स्वतःच म्हटलं आहे की प्रत्येकामध्ये आत्मा वसत असतो. पण त्यांनी तुमची जात ही तुमच्या जन्मावरून ठरवली जाते असं म्हणून ते थोडसं बदललं. कृष्णांचा संदेश लोकांपर्यंत कधीच पोहोचला नाही. त्यांनी म्हटलं तुम्ही पूर्णत्वाचा सार-सारांश आहात. हातांमधली पेशी ही मेंदूत नाही आहे म्हणून जातीबाहेर टाकली जाते का ? त्यांनी कृष्णाला किती चुकीची गोष्ट केली त्यामुळेच त्यांना वंशद्वेषाचा त्रास सहन करावा लागतो आहे. जातीपवादाने तुम्ही हरीजन आणि मागासजातींचा छळ केलात त्यामुळे आता हा वंशद्वेष बूमरँगसारखा उद्भवला आहे.

श्रीकृष्णांच्या आयुष्यातील सौंदर्य म्हणजे त्यांनी म्हटलं जीवन ही एक लीला आहे. त्यांच्यासाठी, इतर कोणासाठी नव्हे कारण ते इतके शक्तिमान आहेत. हा लिलेचा भाग अमेरिकनांनी फार चांगल्या त-हेने उचलला कारण ते कृष्णाच्या भूमींत जन्मले होते, त्याशिवाय सर्व काही लीला आहे. (नाटक) तर तुम्हाला काय आवडतं ? काय चुकतंय ? आवडेल तितक्यांशी लग्न करा, तुमची मुलं वा-यावर सोडा, जनावरांसारखे वागा. मग काय होणार आहे तुम्ही साप कां किडे ? सगळी पध्दत कृष्णाच्या विरोधांत आहे. "कृष्णा कॉन्शसनेस" ची मूर्खपणाची चळवळ, मूर्ख लोक आहेत जे गीता विकत आहेत, पुस्तकीज्ञान ! पण आता अध्यात ती बूमरँगसारखी त्यांच्यावर पालटली आहे. त्यांनी तिला लीला म्हटलं, मग तुम्ही हे कपडे कां घालता ? संन्यासी कां होता ? हे अन्न खायचं नाही ते खायचं नाही असं का म्हणता ? नंतर ते अंमली पदार्थ घेतात, विकतात. जे सत्यावर आधारभूत नाही ते काहीतरी विनाशाप्रत जाइल. सत्य हीच एक विधायक गोष्ट आहे. या सर्व गोष्टी कधीकधी आपल्याला संभ्रमात टाकतात. देवाच्या नावाखाली, श्रीकृष्ण ख्राइस्ट, महंमद साहेब यांच्या नावाखाली या सर्व गोष्टी होतात. काही लोक माझ्या नावाखाली करतात. " श्री माताजींनी असं म्हटलं आहे. सहजयोगींना असं म्हणण्याला मनाई आहे. मला हे खूप झालं. आता कोणीही म्हणणार नाही. श्री माताजी असं म्हणाल्या, " मी म्हणतो, म्हणायला तेवढा आत्मविश्वास आणि जबाबदारी असली पाहिजे मी सहजयोगी आहे. तुम्ही सहजयोगी आहात तुम्ही म्हणत कां नाही ?

आजच्या पुजेनंतर आपण आपल्यामधील श्रीकृष्णाला जागृत केलं आहे. त्याची माधुर्याची आणि संहाराची शक्ति कार्यान्वित होइल. तुम्हाला काळजी नको. तुमचं पूर्णपणे रक्षण केलं गेलं आहे. श्रीकृष्णांनी म्हटलं आहे "योग क्षेम वहाम्यहम्" मी तुम्हाला योग आणि नंतर हित देतो. आपल्याकडे लक्ष पुरविणार ते कार्यान्वित होइल. ते कार्यान्वित होइल. मग कोणी तुम्हाला त्रास देऊ शकणार नाही. ते सर्व बूमरँगप्रमाणे त्यांच्यावर उलटेल, दैवी शिक्षेप्रमाणे अर्थात आई म्हणून मी कोणाला शिक्षा करूं इच्छित नाही पण त्यांना शिक्षा मिळते. मी काय करूं ? ही जागृति फार भयावह असू शकते. स्वत:मध्येच आपल्याला स्वीकारलं पाहिजे की आपल्याला अत्यंत गोड, चांगलं, सामूहिक बनलं पाहिजे. तुम्ही जर सामूहिक नसला तर कृष्ण जीव घेऊन मागे लागेल. तुम्ही जर सामुहिकता नष्ट करायला पहाल तर तो जीव घेऊन मागे लागेल. तो विलक्षण व्यक्ति आहे. तो चतुर, हुशार आणि बुद्धीमान आहे. त्यामुळे काळजीपूर्वक रहा तुम्ही जर सामुहिक असाल तर तो तुम्हाला शक्तिमान करेल, पोषण करेल, तुम्हाला लोणी खायला देइल. तर तुम्हाला सामुहिक बनले पाहिजे.) हा मुख्य भाग झाला. हे लोक जे नुसते प्रोग्रॅमच्या वेळी येतात आतिण नंतर अदृश्य होतात. त्यांना माहित पाहिजे की असं चालणार नाही. तुम्हाला सामुहिक बनलं पाहिजे. जर त्यांना सामुहिक व्हायचे नसेल तर आपल्याला त्यांच्यावर दबाव आणायची इच्छा नाही. पण ते जर सामुहिक नसतील तर ते सहजयोगी नाहीत आणि कोणीही कोणाकडेच त्यांची शिफारस करू नये. सहजयोग्यांचे असामुहिक लोकांशी आणि असहजयोगींयांशी काहीही देणे घेणे असतां नये.

आपल्याला किती सुरेख मुलं, कुटुंबं आहेत. सगळं काही इतकं चांगलं आहे इतकी लोकं जी एकमेकांवर प्रेम करतात आणि एकमेकांचा आनंद लुटतात. इतर लोकांच्या जंजाळामध्ये आपण गुंतून पडतां नये. ते असं आहे. जशी आपल्याकडे छान संयोजित केलेली जागा आहे. जिथे सर्व उजेडामध्ये बसले आहेत. आणि अचानक तुम्हांला वाटावं जिथे अनेक साप प्रत्येकाला चावत आहेत तिथे जावं. मग तुम्ही असं म्हणता नये श्री माताजींनी शिक्षा दिली. तुम्हांला सापाच्या नरकात जावंसं वाटत होतं तर तुम्ही जा आणि ते घ्या. मी कधीच शिक्षा करीत नाही. पण कदाचित श्रीकृष्ण तुम्हांला तिकडे मोहवून नेत असेल. ती त्याची पध्दत आहे, थोडसं सापाकडून चावून घ्यायचं.

श्री कृष्णाच्या मनाप्रमाणे आपण खूप खेळकर असलं पाहिजे. आता तुम्ही सगळे आत्मसाक्षात्कारी लोक आहात खूप आनंदी, खेळकर, खुष आणि किती कर्तबगार . तुमच्यामध्ये अध्यात्मिकता आहे. तुम्ही दुस-यांना आत्मसाक्षात्कार देऊ शकता. रस्त्यामध्ये पण लोक आत्मसाक्षात्कारासाठी विचारतात. कांही लोक इस्टर्न ब्लॉक्सकडे गेले आणि पाच हजार लोकांना साक्षात्कारदिला. कोणीतरी अर्जेंटिनाला गेलं आणि किती तरी लोक मिळाले. हे सगळे माझे हात पसरत आहेत आणि कार्य होत आहे. प्रत्येकाने ते केलं पाहिजे. जागा शोधा, मी तिथे जाउन ते कार्यान्वित करेन. तुम्ही सर्व ते करूं शकता कारण आता तुमच्याकडे शक्त्या आहेत. तुम्ही शक्त्या वापरल्या नाही तर तुम्ही बोथट व्हाल. तर तुमच्या शक्त्या वापरा. तुम्हाला शक्त्या आहेत हा विश्वास ठेवा. पण तुम्हाला सहजयोगाच्या मर्यादेत असलं पाहिजे. नितीमान, चांगलं जीवन व्यतित करा. आणि तब्येत चांगली ठेवा, चे सोपं आहे. जर या वयांत मी असं रात्रंदिवस काम करूं शकते तर तुम्ही सुध्दां करूं शकता. तुम्ही सर्व माझ्याहून खूप लहान आहात.

एक गोष्ट तुमच्या संध्याकाळच्या प्रार्थनेमध्ये तुम्ही विचारली पाहिजे, " मी सहजयोगासाठी काय केलं?" फक्त एक प्रश्न. माझ्यासारखी व्यक्ति किंवा श्रीकृष्ण किंवा कोणीही, आम्ही काही करतो असं आम्हाला वाटतसुध्दा नाही. तर आम्ही काय विचारणार ? जर मला स्वत:चे विश्लेषण करायचं किंवा विचार करायचा झाला तर मी हरवून जाते. माझ्या पलीकडे आहे ते. तुम्हाला स्वत:ला समजलेलं चांगलं. माझ्याविषयी बोलायचं झालं तर मला फक्त वाटतं, जोपर्यंती मी जगते आहे, मला माहित नाही, कदाचित मी सतत जगत राहिन. कदाचित मी सतत जगतेय आहे. पण जोपर्यंत मी या पृथ्वीतलावर आहे, सहजयोग पूर्णपणे प्रस्थापित झालेला मी पाहीन. हे माझं तुम्हाला वचन आहे. "संस्थापनार्थाय" तो परत येतो, धर्माची स्थापना करण्यासाठी. नुसता धर्म नाही तर विश्वनिर्मलाधर्म, जो मानवाच्या साध्या धर्मापेक्षा फार उत्तुंग असा धर्म आहे. विश्वनिर्मलाधर्म फार थोड्या वेळांत या पृथ्वीवर प्रस्थापित होइल.

ईश्वर तुम्हाला आशिर्वाद देवो.

—x—

**श्रीकृष्ण पूजा** इपेविच यू.के.

संध्याकाळचे भाषण (सारांश) 19 ऑगस्ट 90.

श्री विष्णूंच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये सर्व गोष्टी कशा विकसित झाल्या हे आपल्याला ठाऊक असायला हवं. श्री विष्णूंचे दहा अवतार होते. श्री विष्णू हे ते आहेत, जे विराट म्हणून विकसित होतात. विराट ब्रम्हाण्ड अनंत विश्व. हे विष्णूतत्त्व आपल्यामध्ये फार सुरेखरित्या प्रस्थापित झालं आहे. त्याच्या परिणामामुळे आपण शोध घेतो. म्हणजे आपण पैसा, सत्ता, प्रेम, मुलं आणि सर्व प्रकारच्या गोष्टींचा शोध घेत असतो. श्री विष्णूतत्त्वाची सर्वांत मोठी गोष्ट ही की, ते आपल्याला उत्क्रांती देतं, ज्यायोगे आपला विकास होतो. आपण सामाजिक राजकीय, अर्थशास्त्र या बाबींत देखील उत्क्रांत पावतो. फार फार वर्षांपूर्वी भारतसुध्दा स्वतंत्र होता. त्यानंतर तो गुलामीतला देश झाला. नंतर तो लोकसत्ता म्हणून उत्क्रांत झाला. इंग्लिश लोकांना भारत हातातून घालवावा लागला कारण, जर त्यांनी बहुमताचा नियम केला असता तर इंग्लिश लोकांहून जास्त भारतीय होते हे त्यांच्या लक्षात आले. सुज्ञपणा त्यांच्याकडे आला आणि ते गेले.

आपण जेंव्हा प्रश्नाला तोंड देतो तो आपण स्वत:च निर्माण केला आहे हे आपल्या लक्षात येतं. जेंव्हा आपण प्रश्न पाहू लागतो त्यावेळी आपल्यामध्ये सुज्ञता येते. ही आपल्या मध्यमज्जासंस्थेवर आपण मिळवलेली सर्वात मोठी देणगी आहे. उत्क्रांतिची प्रक्रिया सुज्ञता निर्माण करते. जनावरांकडे सर्व काही त्यांच्या आंतमध्ये बांधलेलं असलं तरी ते पशू आहेत म्हणजे देवाच्या ताब्याखाली आहेत. त्यांची स्वत:ची वेगळी ओळख, अथवा सुज्ञपणा आणि मूर्खपणा समजण्याचं व्यक्तित्त्व त्यांच्याकडे नाही. मानव हा आहे ज्याच्याकडे ही महान देणगी आहे, की त्यांच्यामध्ये सुज्ञता विकसीत होते. आत्मशोधामुळे किंवा चुका करून सुधारण्यामुळे. देश, जे खूप

जुने आहेत त्यांच्यामध्ये ही सूज्ञता जास्त विकसित झाली आहे. आता आपण पहातो, या मूर्ख माणसाशी सद्दाम हुसेनशी भांडण्यासाठी, कितीतरी देश, मुस्लीम देशसुध्दा एकत्र झाले आहे. हिटलरच्या वेळी काही त्याला येऊन मिळाले. काहींनी दुसऱ्या बाजूशी साथ दिली . त्यामुळे आपल्याकडे दोन प्रकारचे लोक झाले आणि ते दोन भागात वाटले गेले. आपल्या स्वतःच्या चुकांनी आणि निर्मितीमुळे परिस्थिती निर्माण होते आणि परमचैतन्यामुळे सुध्दा. जेंव्हा तुम्हाला स्वतःच्या चुका दिसतात आणि त्याबद्दल तुम्हाला शिक्षा होते तेंव्हा तुम्ही बदलता आणि दुसरा दृष्टीकोन घेऊन लागता सूज्ञपणा म्हणजे तुमच्या समजण्कीत येणारा एक प्रकारचा प्रकाश. जसा मानव विकसित झाला तसे देवतांनी सुध्दा स्वतःला उत्क्रांत केले. जसे श्री विष्णू वामन अवताराच्या स्थितीला येईपर्यंत मासा होते . नंतर कासव. मग ते परशुराम म्हणून आले ज्यांना ग्रीक पुराणामध्ये "झीयस" म्हणले आहे. नंतर ते श्रीराम म्हणून आले. ते एक होते जे अत्यंत सुज्ञ, सावध, दक्ष औपचारिक आणि सुंदर व्यक्ति होते. त्यांचे स्वतःचं विष्णूचं अवतरण आहे. हे त्यांना विसरायला लावलं होतं जरी स्वतःच्या शक्त्यां बद्दल त्यांना माहित होते. त्यांना मर्यादा पुरूषोत्तम व्हायचं होतं. म्हणजे त्यांना धर्माच्या सर्व चौकटींकडे बघून मानवी आदर्श व्हायचं होतं. हे विसंगत आहे कारण आज जगात यशस्वी असलेली व्यक्ति ती असते जिला कोणत्याही प्रकारच्या मर्यादा नाहीत ती खूप अतिदुष्ट आणि विचित्र प्रकारे वागते. कोणालाही आश्चर्य वाटतं की हे लोक असे इतके महत्वाचे, कामकाजाच्या अग्रस्थानी कसे असू शकतात ? हे सुध्दा मानवी चुकांमुळे होते कारण माणसांना असे लोक आवडतात. असे लोक आहेत ज्यांना लैंगिक विकृती असतात, आणि काही जे मॅशोइस्ट असतात.

मॅशाइस्ट लोकांना दहशत वाटते आणि अशा लोकांचा ते आदर करूं लागतात. त्यांच्या शारिरीक शक्तिने त्यांच्यावर छाप पडते. या शक्तिमुळे जे राष्ट्र अनियंत्रित जुलमी सत्तेखाली असतं ते गुलाम बनतं. मग काहीतरी घडतं आणि लोकांना कळतं की हे चूक आहे. जसं आता जर्मन लोकांना कळलं की हिटलरने चुका केल्या होत्या.

राजकीय प्रश्न इतके नाहीत जितके मूलगामी प्रश्न आहेत. हा मूलगामीपणा राजकारणात उतरला आहे. लोक हा मूलगामीपणा नक्कीच थांबविणार आहेत. कारण त्याबद्दल इतकी भिती आहे. अल्जिरीया, इस्तंबूलच्या सर्व लोकांनी मला सांगितले, " श्रीमाताजी, कृपा करून हा मूलगामीपणा थांबवा. हा प्रश्न फक्त मुसलमानांमध्ये आहे असं नाही. तो सगळीकडेच आहे. प्रत्येक धर्मात मूलगामी प्रवृत्तिचे लोक असतात, याचं कारण काय ? त्याचं कारण असं आहे की ते सत्यावर आधारीत नाही, त्यामुळे ते उजव्या किंवा डाव्या बाजूला पडतं. जेंव्हा ते उजवीकडे जावं तेंव्हा मूलगामी होतं जेंव्हा डावीकडे जातं तेंव्हा ते आत्महत्या वगैरे करूं लागतात. मूलतः हा मूलगामीवाद आहे, कारण इतर धर्म सत्यावर आधारित नाहीत. सत्य हे विचार करण्यासाठी पुढे ठेवलं आहे. जसं दुसऱ्या दिवशी टोरॉंटोला मुलाखतीत,

स्त्री वार्ताहाराने मला विचारलं, " भारतामधील जातीच्या पध्दतीबद्दल तुम्हाला काय वाटतं ? मी तिला म्हटलं ते भयानक आहे. तो शाप आहे. ती म्हणाली, " मग त्यांना जाती का असतात ? मी म्हणाले, सुरवातीला जात जन्माप्रमाणे नव्हती. कामाप्रमाणे होती. रामाचं जीवन वाल्मिकीने लिहिलं होतं, जो संत होण्याआधी लुटारू होता. तो कोळी होता. ब्राम्हण नव्हता. पण कोळी आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर ब्राम्हण झाला. गीता लिहिणारी व्यक्ति, व्यास हे कोळीणीचे अनैतिक मूल होते, अशी व्यक्ति गीता लिहिण्याइतकी समर्थ कशी होऊ शकेल ? गीतेमध्ये चुकीच्या गोष्टी त्यांनी घातल्या आहेत. की जात ही तुमच्या जन्मानंतरच्या व्यक्तित्वावरून ठरवली जाते, जन्मा नंतर, ते असं कसं म्हणू

शकतील कारण, ज्याने गीता लिहीली ती व्यक्ति तशी नव्हती कां ? ते सगळे स्वत:च्या धर्मविरूध्द कांहीतरी करण्याचा प्रयत्न करतात. ख्रिश्चन धर्ममध्ये ख्रिस्ताने सांगितलं आहे. " तुमचे डोळे भिरभिरणारे नसतील" मी तिला विचारलं, "तूं मला ज्या लोकांचे डोळे भिरभिरत नाहीत असे ख्रिश्चन्स पाश्चात्यांमध्ये दाखवशील कां ?"

सर्व शिक्षण हे अनुभवांतून असतं. सहजयोगामध्ये आपल्याला देवाचा अनुभव आला. नंतर आपल्याला आनंदाचा अनुभव आला. त्यानंतर आपल्याला सुरेख सामुहिक जीवन जगण्याचा अनुभव आला. आणि आपल्याला खरोखर जाणीव होते की आपण एका आईपासून जन्मलेलं एक कुटुंब आहोत. आपल्याला माहित आहे. आणि आपल्याला त्याबद्दल खूप आत्मविश्वास आहे. दुस-या कोणत्याही अवतरणाला करता आलं नाही, ते आपल्याला मिळालं आहे. त्यापैकी एक गोष्ट म्हणजे त्या सर्वांपेक्षा आपण जास्त टिकून आहोत. त्यांना वाटलं, हे सारं त्यांना खूप झालं ! त्यामुळे ते सारे फार लवकर अदृश्य झाले. ज्ञानेश्वरांसारख्या व्यक्तिनेसुध्दा तेविसाव्या वर्षी समाधी घेतली. ख्राइस्टचं कुसीफिकेशन झालं. जेंव्हा ते पंचेचाळीस वर्षांचे होते, तेंव्हा महंमद साहेबांना वीष मिळालं. ही जर अवतरणाची परिस्थिती आणि अवस्था असली कीं, त्याने जग पाहिलं न पाहिलं की त्याने स्वत:ला गुंडाळावं आणि जाण्याची तयारी करावी. मग मला वाटतं, मी खूप धीट आहे. मी अजून टिकले आहे ! जबाबदारी सुध्दा वेगळया प्रकारची आहे. त्यांना कोणाला आत्मसाक्षात्कार द्यायचा नव्हता. फक्त भाषण घ्यायचं होतं , तेवढंच ! सुसतं भाषण द्यायचं, आणि या जगातून निघून जायचं, हे फार सोपं आहे. मला असं आढळलं, आपला कॅन्हवास फार मोठा आहे. प्रथमतः आपल्याला अनेक देश आढळतात, जे सहजयोगामध्ये गुंतले आहेत आणि त्यांच्यासाठी ते, तो कार्यान्वित करीत आहेत.

पहिला कॅनव्हास आपल्याकडे आहे, तो म्हणजे आपल्याकडे वेगवेगळया प्रकारचे, स्वभाव धर्मांचे, पातळीचे, सर्व प्रकारच्या चालीरीती, अहंकार वगैरेंचे लोक आहेत. दर वेळेला मला नवी विविधता दिसते. पण आपण चांगलं केलं आहे. बाकी गुरू किंवा अवतरांणाच्याही हे साध्यंच होतं. जे खरोखर चांगले लोक होते ते सगळं काही, जे सत्य आणि चांगलं होतं, ते करीत होते. त्यांच्याकडे सहजयोगीयांची जबाबदारी नव्हती. कोणी कांही त्रास घेतला नाही. त्यांना त्यांची कुटुंब, मुलं सर्व काही मागे ठेवून काम करावं लागलं. शंकराचार्यांनीसुदा त्यांच्या शिष्यांना संन्यास घ्यायला सांगितला. ख्राइस्टच्या शिष्यांशीसुध्दां तेच झालं. बुध्द, महावीरसुध्दा, कोणीही, त्या सर्वांना संन्याशी व्हावं लागलं. त्यांना त्यांच्या कुटुंबाचं, बायकामुलं नोकराचं ओझं त्यांच्या डोक्यावर नको होतं. याउलट सहजयोगामध्ये आपल्याला दाखवायचं आहे, की मानवाला या जगात रहात असतांना सुध्दां आत्मसाक्षात्कार मिळू शकतो. आपल्याला कांही सोडून द्यायचं नाही किंवा आपला साक्षात्कार मिळविण्यासांठी हिमालयांत जायचं नाही. नंतर एके दिवशी तिथेच संपून जायचं आपल्याला या जगांतच रहायचं आहे. या जगांत काम करायचं आहे. आणि इथेच सहजयोग प्रस्थापित करायचा आहे. हे फार कठीण आहे पण आपण सांभाळलं आहे. आपण एका साध्या गोष्टीमुळे साध्य केलं आहे. ती म्हणजे अनुकंपा. अनुकंपेशिवाय हे कार्यान्वित झालं नसतं. तुम्ही कितीही प्रयत्न केला, कसलीही रीत लावली, कसलीही विभागीकता तुम्ही केली, ते सर्व फोल ठरलं असतं. ही सूज्ञतेने प्रकाशित झालेली अनुकंपा आहे.

आज आपण आहोत, त्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये, आपल्यामध्ये किती अनुकंपा आहे, हे आपल्याला मोजलं पाहिजे. नुसती आपलं कुटुंब, नातेवाईक देश यांच्याविषयी नाही, तर पूर्ण जगाविषयी, दुसरी गोष्ट आपल्याला माहित पाहिजे, ती ही की इतर सर्व लोक जे या पृथ्वीतलावर आले. त्यांनी त्यांच्या देवत्वाविषयी काहीही भक्कम पुरावा दिला नाही. पण तुमच्याकडे माझ्या देवत्वाचा तुमच्या देवत्वाचा आणि या सर्व ब्रम्हचैतन्याचा भक्कम पुरावा आहे. तुम्ही फोटो पाहिले आहेत. आणि या अव्यक्त जगात गोष्टी कशाप्रकारे कार्यान्वित होतात. ते फोटोग्राफ्स आणि कॅमेरे पकडीत आहेत, ज्या तुमच्या डोळ्यांनी दिसत नाहीत. याशिवाय सुध्दा उत्क्रांतीच्या प्रक्रियेला सुध्दा आपल्यामध्ये कार्यान्वित होउन, आपल्या विश्वासाचा सारसारांश व्हायचं आहे. हाच अंध विश्वास नाही. विश्वास आहे व जसं तुम्ही फुलं पाहाता आणि तरीही तुम्ही विश्वास ठेवता फुलं नाहीत असा, तर आपण म्हटलं पाहिजे की, तुम्ही वेडे आहात असा तुम्ही नुसता देखावा करता, पण तुम्ही नाही.

मुख्य प्रश्न आपल्याला आहे तो, आपल्या व्यक्तित्वामध्ये आपण हे कशाप्रकारे शोषून घ्यायचं, की आपण या प्रकारच्या अवतरणासमोर उभे आहोत. आपण अशा युगामध्ये जन्मलो आहोत. जे फार महत्वाचं आहे. हा फार महत्वाचा काल आहे. आपल्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये , जीला कुंडलिनीच्या जागृतीने गतीमान केले आहे. खूप उच्च स्तराला पोहोचलो आहोत. आपण वेळ, पाप यांपलिकडे अवकाशांत राहात आहोत. अजूनही आपण आपल्या स्थितीचा अंगीकार करत नाही. आपण आपल्या स्थितीचा स्विकार केला पाहिजे. आणि जरी मी इतकी साधी वाटले, खूप साधेपणाने बोलते तरी माझ्याबद्दल भितीयुक्त आदर नको. तुम्हाला जाणीव पाहिजे, ते तुमच्यामध्ये आहे. तुमच्यामध्ये ते खास व्यक्तिमत्व आहे, ज्याला देवाने या सर्व देणग्या बहाल केल्या आहेत. अर्थात पैशाने दैवी देणग्या देता येत नाहीत. ही देवाची अनुकंपा आहे, ज्याने तुम्हाला ही देणगी दिली आहे, विचार करून, तुमची पारख करून की तुम्ही काहीतरी महान करण्याच्या लायकीचे आहात. दैवी आराखडा तुम्ही कार्यान्वित कराल, म्हणून ही शक्ति तुम्हांला दिली आहे.

उत्क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये जेंव्हा श्रीरामांनी मानव होऊन कार्य केलं, त्यांनी त्यांच्या जीवनकालामध्ये त्या सगळ्या गोष्टी कार्यान्वित केल्या. पण तरी सुध्दां आणखी एका उत्क्रांतीची गरज होती. आणि ते श्रीविष्णूचं पूर्ण अवतरण होतं जे श्रीकृष्ण म्हणून आलं. श्रीकृष्णाचं पूर्ण रूप काय आहे ? ते असं आहे ते म्हणाले पूर्ण जग हे एक नाटक आहे. की तुम्हाला गोष्टी गंभीरपणाने घेता नयेत. पण सहजयोग्यांना हे माहित पाहिजे की, प्रथम तुम्हाला श्रीरामासारखं झालं पाहिजे. श्री विष्णूला सुध्दां प्रथम श्रीराम व्हावं लागलं. आपल्यांसाठी अजूनही ती श्रीरामाची पायरी आहे. त्यांना खूप त्याग करावा लागला, खूप त्रास, अपमान सोसावा लागला, या पातळीपर्यंत की त्यांच्या पत्नीचा त्यांना त्याग करावा लागला. त्यानंतर ते कधीही भेटले नाहीत कारण ती सुध्दा अदृश्य झाली. त्यांना इतक्या तपश्चर्यमधून जावं लागलं. मी म्हणत नाही की, सहजयोग्यांना तपश्चर्या करावी लागते. कारण तुम्हाला सहस्त्रारावर जन्म दिला आहे. ख्रिस्ताला ज्या गोष्टींमधून जावं लागलं, त्याबद्दलि तुम्हाला काळजी नको. त्यांना ते करावं लागलं. त्यांना तपस्या करावी लागली. तशाप्रकारे त्याचं उत्थान झालं.

तुम्हांला सर्व प्रकारे आशिर्वादीत केलं गेलं आहे, कुटुंब, सोई, पैसे वगैरे, पण हा मोहसुध्दां असू

शकतो. जेंव्हा हे मोह येतात. त्यावेळी तुम्ही सापळ्यांत सापडू शकता. आपल्याला समजलं पाहिजे की, तुम्हांला श्रीकृष्णासारखं व्हायचं असेल तर ती नुसती मौजमजा नाही.म्हणायचं की, श्रीकृष्णाने लीला प्रस्थापित केली पण आधी त्याचं आयुष्य फार कठीण होतं. त्यांच्या मातापितरांना बंदीखान्यात घातलं होतं. त्यांना कसं गोकुळात नेण्यात आलं होतं, कितीतरी राक्षस जे त्यांना मारण्यासाठी आले होते त्यांना त्यांनी कसं ठार केलं, नंतर ते कंसाला मारण्यासाठी परत गेले. आणि त्यानंतरच ही लीला आहे असं त्यांनी म्हटलं. त्याप्रमाणेच आपल्यामध्ये सुध्दा आपल्याबाबत हा प्रश्न आहे. प्रथम आपल्यामधील कंस आपण मारला पाहिजे आपल्यामध्ये दुसरे राक्षस आपण मारले पाहिजेत. नंतरच ही लीला आहे असं आपण म्हणू शकतो. त्याचं जीवन दुहेरी होतं. एका बाजूला गोप आणि गोपी यांच्या बरोबर लीला खेळत. एके दिवशी इंद्राला त्यांची फार इर्षा वाटली आणि पावसाने त्यांना सर्वांचा नाश करावा असं वाटलं. ते सर्व शेतांमध्ये त्यांच्या गायी राखीत होते. आणि जोराचा पाऊस पडूं लागला. त्यांना वाटलं आतां ते नष्ट होणार. अचानक श्रीकृष्णांनी पर्वत उचलला आणि सर्व गोप आणि गोपी त्याखाली जाऊन उभे राहिले. ही लीला आहे हे दाखविण्यासाठी अशाप्रकारे ते केलं गेलं. श्रीकृष्णांना पूर्णपणे माहित होतं की, ते श्रीविष्णूंचे पूर्ण अवतरण होते की, ते उच्चतम बिंदूला पोहोचले होते, की त्यांना लीलेची कल्पना प्रस्थापित करायची होती. अशाच प्रकारे सहजयोग्यांना ही लीला होते आहे.

दुसऱ्या बाजूला आपल्याला समजलं पाहिजे की, सहजयोग कार्यान्वित करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. प्रथम सहजयोग तुमच्यावर कार्यान्वित झाला पाहिजे. जर तुम्हाला आनंदी वाटत असेल. तुम्ही हसू शकत नसाल, तर तिथे काहीतरी चूक आहे, जे सुधारलं पाहिजे. सहजयोग्याची पहिली खूण म्हणणे त्याच्या चेहऱ्यावर तेज असतं. तो नेहमी आनंदात, खुश असतो. त्याचवेळी तो जबाबदारही असतो. उदाहरणार्थ, मी असं ऐकलं की, फक्त पांच टक्के सहजयोगी जबाबदाऱ्या उचलतात. तुम्ही सर्वांनी जबाबदाऱ्या घेतल्या पाहिजेत कारण त्याच प्रकारे तुमची उत्क्रांती होऊ शकते. नुसतं मजा करून किंवा लीला म्हणून नीट आपलं काय चुकतं आहे हे शोधून काढा. आत्म्याचा शोध घेतला पाहिजे. बरेच लोक त्यावर नुसता मोठा पडदा टाकतात आणि त्यांना ते बघायचं नसतं. तुम्ही स्वत: बघा. " मी असं का करतो आहे ? मी असं करण्याची काय गरज होती ? " छोटया गोष्टींमध्ये आपण क्षुद्रता दर्शवतो. जसं मी ऐकलं की, कोणाला तरी प्रेझेंट मिळालं नाही. इथे किती लोक आहेत आणि कोणाला प्रेझेंट मिळालं नाही असं होऊ शकतं. जर सर्वांना प्रेझेंट मिळालं,तर मी म्हणेन तो चमत्कारच झाला ! देवपण त्याबद्दल वचन देऊं शकत नाही. मग तक्रार करायची, मला बक्षीस मिळालं नाही म्हणून. मी असं करणार नाही. बक्षिस हे फक्त व्हायब्रेशन्सनी दिलेलं प्रतिक आहे. तुम्हांला ते मिळालं नाही तर, तुम्हाला टाकलं गेलं किंवा वाईट वागणूक मिळाली असा त्याचा अर्थ होत नाही किंवा कोणाला तुमचा अपमान करायचा आहे, असा अर्थ होत नाही. तो मुद्दा नाही. या तळाच्या पातळीवरून तुम्हाला वर यायचं आहे. अशा पातळीवरची लोकं खूप कमी पातळीच्या गोष्टी करतात. चांगले होण्यापेक्षा वाईट होणं सोपं आहे. आपल्याहून उच्च पातळीवरच्या व्यक्तिचं अनुकरण करण्याऐवजी आपल्याहून खालच्या पातळीवर असलेल्या कोणाला तरी आपण पहातो आणि त्याचं अनुकरण करू लागतो.

तुम्ही जर माझे अनुयायी असाल तर तुम्हाला वर पाहिलं पाहिजे. तुम्ही खालच्या क्षुद्र गोष्टींकडे कसे जाऊ शकतां ? सहजयोगाचा विस्तार तुम्ही समजून घेतला पाहिजे. पूर्ण दर्शन, सहजयोगाची दूरदृष्टी ते क्षितिजापलीकडे आहे. ते इतकं महान आहे, आणि तुम्ही ते कार्यान्वित करीत आहात. त्यासाठी तुमच्याकडे शक्त्या आहेत त्यांसाठी तुम्हाला विशेष करून निवडले गेले आहे. तुमच्या दृष्टीपुढे चित्र उभे करून तुम्ही

कोण आहांत. एकदा तुम्हाला समजलं तुम्ही कोण आहात, त्या महान पुरुषाशी तुमचा संबंध कळला तर मग मला काहीच सांगायला नको . कारण नुसतं तुम्हीच म्हणतां, " श्री माताजी, तुम्ही सर्व कांही करता, आम्ही कांहीच करत नाही. ते सर्व केलं जात आहे." तुमच्या हृदयामध्ये तुम्हांला ती जाणीव होते. दरवेळी तुम्ही कांही करता त्यावेळी तुम्ही आनंद उपभोगीत जाता. तुम्हाला जर असा विचार आला, तुम्ही नुसतं करीत आहात " मी आनंद उपभोगितो आहे. मी करत नाही श्री माताजी करीत आहेत." तर सूज्ञता आली आहे, हे तुमच्या लक्षात येतं. हे ते ज्ञान आहे जे तुम्हाला प्रकाश देणार आहे. या सुज्ञतेमध्ये लीला काय आहे ते तुम्ही जाणाल . आणि आपण स्वतः आनंद लुटायचा आहे. हे देवाचं कार्य आहे ज्यासाठी आपल्याला निवडण्यात आलं आहे आणि आपण ते तडीस नेलं पाहिजे.

चिखलामधून आपल्याला कमळासारखे लोक निर्माण करायचे आहेत. आपल्याला कमळ बनायचे आहे, सुवासिक, सुंदर, उदार. आपल्याला हे देवाकडून देणगी म्हणून मिळालं आहे हे समजलं पाहिजे. जेंव्हा तुमच्यामध्ये श्रीकृष्णाची ती शक्ति येते तेंव्हा ती लीला होते. जेंव्हा तुमच्यामध्ये या शक्त्या येतात तेंव्हा तुमचे सद्‌गुण तुम्ही उपभोगिता आणि ते इतरांना देता. लोक तुम्हाला पहातात आणि ते म्हणतात की तुमच्याकडून समजून घेण्यासारखं काही आहे. शिकण्यासारखं काही आहे. जेंव्हा अंवती भंवती सगळीकडे मूर्खपणा पसरलेला दिसतो तेंव्हां आपल्याला वर उठलं पाहिजे आणि आपल्या आत्म्याची सूज्ञता वापरली पाहिजे.

ईश्वर तुम्हाला आशिर्वाद देवो.

श्री हनुमान पूजा

फ्रँकफर्ट
31 ऑगस्ट 1990.

श्री हनुमान हे आपल्या शरीरामधील महान चरित्र आहे. ते स्वाधिष्ठानापासून ते थेट आपल्या मेंदूपर्यंत असतात आणि आपल्या भविष्याच्या नियोजनासाठी लागणारे सर्व जरूरीचे मार्गदर्शन किंवा बौध्दीक क्रियांचा ते पुरवठा करतात. ते आपल्याला मार्गदर्शन देतात आणि रक्षण करतात. जर्मनी ही अशी जागा आहे जिथे लोक खूप कार्यक्षम असतात. खूप उजव्या बाजूकडे असतात, त्यांच्या शरीराचा जास्त वापर करतात आणि यंत्राकडे खूप कल असलेले असतात. ही फार आश्चर्याची गोष्ट आहे की, श्री हनुमानासारखे दैवत जे चिरंतन बालक आहे, माकडासारखं आहे, त्याने मानवाच्या उजव्या बाजूला असावं त्यांना सांगितलं गेलं होतं की मानवामध्ये त्यांनी सूर्याला काबूत ठेवावं, त्याला जास्त शीतल, सौम्य बनवावं. जेंव्हा ते जन्मले त्यावेळी त्यांना सांगितले गेलं होतं की त्यांनी सूर्याची काळजी घ्यावी तेंव्हा बालक असल्याने त्यांनी विचार केला की, त्याला खाऊन कां टाकू नये. ते विराटाच्या अंगावर धावत गेले आणि सूर्याला गिळलं कारण त्यांना वाटलं त्यांच्या पोटातच असल्यावर सूर्याची नीट काळजी घेतां येईल.

उजवी बाजू ताब्यात ठेवण्यासाठी केलेली त्यांची ही बालकासारखी वर्तणूक, हे त्यांच्या चरित्रामधलं सौंदर्य आहे. सर्वसाधारणपणे उजवीकडील लोकांना मुले होत नाहीत. ते उजव्या बाजू बाहेर असतात आणि जर त्यांना मुलं झाली तर मुलांना ते आवडत नाहीत कारण त्यांना त्यांच्या मुलासाठी वेळ नसतो. ते नेहमी खूप कडक शिस्तीचे असतात आणि त्यांच्यावर ओरडतात. आणि त्यांना मुलांना कसं हाताळायचं ते कळत नाही. किंवा मग ते जास्त लाड करणारे असतात कारण त्यांना वाटतं की, " मला हे कधीही मिळालं नाही तर ते मला माझ्या मुलांना देऊ दे." तर या अत्यंत उजवीकडे झुकलेल्या लोकांना हनुमान मिळाले आहेत, जे बालक आहेत.

ते रामाचं सर्व कार्य करण्यासाठी अति आतूर आहेत श्री राम हे संतुलनाने परिपूर्ण असं चरित्र आहे. सॉक्रेटिसने वर्णन केलेला "हितकारी राजा" ते आहोत. त्यांना सचिव म्हणून त्यांच्या बरोबर कोणीतरी हवं होतं. श्री हनुमान हे ते होत ज्यांची या कामासाठी निर्मिती केली गेली. ते अशाप्रकारचे श्रीरामांचे सेवक आणि सहाय्यक होते, आपल्या धन्याबद्दल सेवकांसुध्दा इतके स्वतःला अर्पण करीत नसतील. श्रीरामांप्रत त्यांचे समर्पण असं होतं की मोठं होइपर्यंत त्यांना नऊ सिध्दी मिळाल्या होत्या. या सिध्दी अशा की ते मोठे होऊं शकत होते, ते इतके वजनदार होऊ शकत होते. की कोणीही त्यांना उचलू शकत नव्हतं, ते अदृश्य होऊं शकत होते वगैरे एखादी व्यक्ति जी खूप उजवीकडे आहे तिला श्री हनुमान या सिध्दींनी काबूत ठेऊ शकतात. आता एखादा मनुष्य जो त्याच्या जीवनांत फार जोरात पळतो आहे त्याला तुम्ही कसे ताब्यात घेऊ शकता ? श्री हनुमान त्याला अशाप्रकारे करतात की त्याला त्याची गति कमी करावी लागते. ते त्याची पावलं खूप जड करतात. किंवा ते त्याचे हात इतके जड करतात की ती व्यक्ति त्याच्या हातांनी जास्त काम करूं शकत नाही. फार उजवीकडच्या व्यक्तिला ते विलक्षण आळसावलेलं जडत्व ते देऊ शकतात.

दुसरी सिध्दी ही कीं ते त्यांची शेपटी कितीही लांब करूं शकतात आणि तिने लोकांना हाताळू शकतात. त्यांच्याकडे ह्या सा-या तुम्ही म्हणता तशा माकडचेष्टा आहेत. नंतर ते हवेत उडू शकतात. ते

इतके मोठे होऊ शकतात की त्यांनी बाजूला सारलेल्या हवेला त्यांच्या स्वत:च्या वजनाहून जास्त वजन असतं. ते आर्किमिडीजच्या तत्वासारखं आहे. ते इतके मोठे होतात की त्यांचे शरीर हवेमध्ये होडीसारखं तरंगू शकतं. हवेत उडून ते एकीकडून दुसरीकडे संदेश पाठवू शकतात.

आकाशतत्वाचं सूक्ष्मतर श्री हनुमानांच्या हुकूमतीतं आहे. ते आकाशतत्वाच्या सूक्ष्मतराचे अधिपती आहेत आणि त्यामधून ते संपर्क साधतात. आपल्यामध्ये असणा-या सर्व संपर्क साधणा-या वाहिनीविरहीत असणा-या आपल्या ग्रंथी ज्या श्री हनुमानांच्या गतीमुळे पिटयूटरी वापरते, त्यांचं कारण ते निराकार स्थितीमध्ये जाऊं शकतात. तसंच हा माइकचा संपर्कसुध्दा लाऊडस्पीकर घ्या. आपल्याकडे टी.व्ही. आहेत. रेडिओ आहेत ज्यावर आपण आकाशतत्वामधलं कांहीही पकडतो ते श्री हनुमानांचे आशिर्वाद आहेत. आणि उजव्या बाजूकडील लोकांना ते मिळू शकतात. फक्त उजवीकडील व्यक्ति कॉर्डलेस फोन, तारा, वायरलेस अशा अवकाशातील गोष्टींचा शोध लावू शकतात. कनेक्टर - संपर्क साधण्याच्या साधनाशिवाय ते हे साधू शकतात. तर अशी सर्व अवकाशातील जोडणी या महान इंजिनियर श्री हनुमान यांनी केलेली आहेत. ते इतके अचूक आहेत की तुम्ही त्यांच्यात दोष काढू शकत नाही किंवा आव्हान देऊ शकत नाही. कदाचित तुमचं साधन बरोबर नसेल, पण जोपर्यंत त्यांची अवकाशातील कार्य पाहिलं तर ते अगदी बरोबर असेल. शास्त्रज्ञ त्याचा शोध घेतात आणि विचार करतात की ते निसर्गात आहे. पण ते कसं असेल याचा ते विचार करीत नाहीत. ते आहे असंच ते गृहित धरतात. हे सारं श्री हनुमानाचं काम आहे. ज्यांनी हे सारं सुरेख जाळं तयार केलं आहे आणि या जाळयामुळे या सर्व गोष्टी कार्यान्वित होतात. आपल्या अणूंवर मिळणारे व्हायब्रेशन्ससुध्दा ज्याप्रमाणे सल्फरडाय ऑक्साईड मध्ये ऑक्सिजन असतो जो कंपन पावतो. आणि आयसोमेट्रिक आणि सिमिट्रिक प्रकारची व्हायब्रेशन्स असतात. ती सारी हनुमानांनी निर्माण केली असतात.

त्यांच्याकडे आणखी एक महान सिध्दी अणिमा ही आहे. त्याचा अर्थ ते अणूं, रेणूंमध्ये प्रवेश करूं शकतात. ब-याच शास्त्रज्ञांना वाटतं की त्यांनी अणूरेणूंचा शोध नव्या युगामध्ये लावला आहे पण अणूरेणूंचं वर्णन आपल्या जुन्या ग्रंथांमध्ये आढळतात. जिथ जिथे तुम्ही इलेक्ट्रोमॅग्नेटीक प्रवाह कार्य करताना पहाता तो नेहमी हनुमानाच्या आशिर्वादामुळे कार्यान्वित होत असतो. श्री गणेशामध्ये मॅग्नेटचा प्रवाह आहे. ते लोहचुंबक आहेत. इलेक्ट्रोमॅग्नेटीक प्रवाहाची भौतिक बाजू म्हणजे तो श्री हनुमानांची शक्ति आहे. पण जड वस्तूंकडून ते मेंदूकडे जातात. स्वाधिष्ठानामधून ते मेंदूकडे जातात. मेंदूतही ते आपल्या मेंदूच्या वेगवेगळया भागांचे संधान घडवून आणतात. जर गणेशांनी आपल्याला सूज्ञता दिली तर हनुमान आपल्याला विचार करण्याची शक्ति देतात.

ते आपलं रक्षण करतात याकरीता की आपण वाईट गोष्टींचा विचार करूं नये. जर गणेशांनी आपल्याला सूज्ञता दिली तर श्री हनुमान आपल्याला सदसद् विवेकबुध्दी देतात. जिथे तुम्हाला सदसद्विवेक बुध्दीची गरज पडत नाही ती सूज्ञता. कारण तुमच्या सूज्ञतेमुळे काय चांगलं काय वाईट हे तुम्हांला कळतं. पण व्यक्तिमत्वात सदसद्विवेकबुध्दीची गरज आहे, जिथे त्याला काबूत ठेवायचं असतं. आणि श्री हनुमानाकडून हे संयमन येतं. ते मानवामधील सदसद्विवेक बुध्दी आहेत. हा प्रामाणिकपणा हीच सूक्ष्मतर शक्ति आहे. जी आपल्याला " सत असत विवेक बुध्दी" देते ज्याचा अर्थ सत्य आणि असत्य यांमधील भेद योग्यप्रकारे जाणणारी बुध्दी.

सहजयोगाच्या पध्दतीमध्ये आपण श्री गणेशांना अध्यक्ष म्हणतो. विद्यापीठाचे कुलगुरू. ते आपल्याला पदवी बहाल करतात आणि आपण कोणत्या स्थितीमध्ये आहोत ते जाणण्याला मदत करतात. ते आपल्याला निर्विचार समाधी, निर्विकल्प समाधी आणि आनंद देतात. पण बौध्दीक जाणीव की " हे चांगलं आहे." " हे आपल्याला हितकारक आहे" ही श्री हनुमानांच्याकडून येते आणि पाश्चात्यांसाठी ती बौध्दीक असणं फार महत्वाचं आहे. नाहीतर त्यांना कळणार नाही. जर ते बौध्दीक नसेल तर ते निराकरात येऊ शकणार नाहीत. त्यांच्याशिवाय जरी तुम्ही साधू झालात तरी तुम्ही साधूत्वाचा आनंद उपभोगाल पण हे साधूत्व तुम्ही जर हिमालयात रहात असाल तर ठीक आहे किंवा तुम्ही लोकांना आत्मसाक्षात्कार देण्यासाठी गेलात तर बरोबर आहे, हे सगळं तारतम्य मार्गदर्शन आणि रक्षण श्री हनुमान आपल्याला देतात.

जर्मनी हा असा देश आहे जो जास्त करून उजव्या बाजूचे मूलतत्व आहे त्यामुळे त्यांची पूजा करून उजव्या बाजूचे संरक्षण मिळणं फार महत्वाचं आहे. पण या सर्व विवेक बुध्दीमध्ये त्यांना एक गोष्ट माहित आहे की श्रीरामाचे ते पूर्णपणे समाधान न देण्याची इच्छा असणारे सेवक आहेत. श्रीराम कोण आहेत ? ते हितकारी राजा आहेत. ते हितांसाठी कार्य करतात आणि औपचारिक व्यक्ति आहेत. स्वतःला पुढे ढकलीत नाहीत. खूप संतुलित आणि समतोल व्यक्ति आहेत. श्री हनुमान हे श्रीरामाचं काम करण्यासाठी फार आतूर आहेत. तारतम्य हे की जे कांही श्रीराम सांगतात ते ते करतात. ते गुरू शिष्या सारखं नातं आहे. त्याहूनही जास्त शिष्य हा दुस-याला पूर्ण समाधान देण्याची उत्कट इच्छा असणारा सेवक आहे. देवाला पूर्णपणे शरणागत असलेला. त्यांची मुख्य गोष्ट आहे शरणागति. उजव्या बाजूकडील लोक सर्वसाधारणपणे त्यांच्या वरिष्ठ अधिका-यांप्रत त्यांच्या नोकरीप्रत, कधीकधी त्यांच्या पत्नीशी देखील अतिशय शरणागत असतात पण चुकीच्या लोकांना समाधान देण्याची त्यांची इच्छा असते. त्यांना तारतम्य नसते. जर तुम्ही श्री हनुमानांची मदत घेतली तर ते तुम्हाला सांगतील की तुम्हाला सर्व शक्तिमान देवाला शरण गेलं पाहिजे. दुस-या कोणाला नाही किंवा श्रीरामासारख्या असणा-या तुमच्या गुरूला. मग तुम्ही स्वतंत्र पाखरं असता आणि सर्व नऊ शक्त्या तुमच्यामध्ये असतात

अतिशय विचार करणं आणि तुमचा अहंकार यावर श्री हनुमान हा उतारा आहे. लोकांचा अहंकार ते कसा नष्ट करतात हे त्यांनी जेंव्हा पूर्ण लंका जाळली आणि रावणाची कशी चेष्टा केली त्यात फार गोड रितीने दर्शविलं आहे. कारण जो कोणी अहंकारी असेल त्याची चेष्टा केली पाहिजे मग तो ठीक होतो. जेंव्हा रावणाने विचारलं " तू कोण आहेस ? नुसतं माकड." हनुमानाने त्याची शेपटी त्याच्याकडे ढकलली आणि तिने त्याच्या नाकाला गुदगुल्या केल्या. जेंव्हा कोणी अहंकारी तुम्हाला त्रास देण्याचा प्रयत्न करतो. हनुमान एक आहे. जो त्याची चेष्टा करेल अशी की, तुम्हाला आश्चर्य वाटेल की ही व्यक्ति "हम्प्टी डम्प्टी" सारख्या उड्या मारेल. खाली कोसळेल, त्याचं डोकं फुटेल.

अहंकारी लोकांपासून तुमचे रक्षण करणं हे हनुमानाचं काम आहे आणि अहंकारी लोकांचाही त्यांचा पाणउतारा करून तो रक्षण करतो. सद्दाम हुसेन सारख्या. त्याच्या बाबतीत हनुमानाला नुसतं काम करायला सांगितले, या सद्दामला त्याने कशा कठीण परस्थितीमध्ये टाकलं, त्याला काय करायचं हे कळत नाही. कारण समजा तो म्हणाला, " मी लढाई करेन, तर पूर्ण इराक नष्ट होइल. तो नष्ट होइल. कुवेत नष्ट होइल सगळं पेट्रोल नष्ट होइल, आणि सगळे अडचणीत पडतील. सद्दामचं काय ? तो असणार नाही कारण

जर अमेरिकन लोकांना लढाई करायची असली तर ते त्याच्या देशात जाऊन लढतील. ते कांही अमेरिकेत लढाई करणार नाही. तर आता हनुमान सद्दामच्या मेंदूवर काम करतो आहे. त्याला सांगतो आहे. "आता पहा, तू असं केलंस तर असं होइल. तो सर्व राजकारणी मुत्सद्यांच्या, अहंकारी लोकांच्या मेंदूवर काम करतो आणि मग कधीकधी ते त्यांची धोरणे बदलतात. ते वळतात आणि तशा प्रकारे ते काम घडतं.

श्री हनुमानाची दुसरी गुणवत्ता म्हणजे ते लोकांना लहरी बनवितात. ते दोन अहंकारी लोकांची भेट घडवितात. आणि अशा प्रकारची परिस्थिती निर्माण करतात की ते दोघे मित्र बनतात, सौम्य होतात. आपल्यामधील ज्यांची पूर्ण कृति आपल्या अहंकाराकडे लक्ष देण्यासाठी कार्यान्वित होते. ते तारतम्य राखण्यासाठी की हा माझा अहंकार आहे, तो कार्य करतो आहे, आणि नंतर बालकांसारखं गोड आणि आनंदी. ते नेहमी नाचण्याच्या मूडमध्ये असतात श्रीरामासमोर ते नेहमी खाली मान घालून असतात आणि नेहमी श्रीरामांची जी जी इच्छा असेल, ते ते करायला त्यांना हवं असतं. जर गणेश माझ्यामागे उभे असतील तर हनुमान माझ्या पायाशी असतात जर जर्मनी हनुमानाप्रमाणे दुसऱ्याला पूर्ण समाधान देण्याची उत्कट इच्छा असणारा झाला तर काय प्रभावी शक्ति आपल्याकडे आहे !

श्री हनुमानांचा रामांना पूर्ण समाधान देण्याची, इच्छा असणारा स्वभाव इथपर्यंत दिसतो की जेंव्हा सीतेने त्यांना माळ दिली तेंव्हा तिच्या आत राम नसल्यामुळे ते ती घालत नव्हते. सीतेला वाटलं की ते सारखे अवती भवती असतात आणि तिच्या एकांतावर अतिक्रमण होतं. म्हणून तीने सांगितलं की फक्त एका कामासाठी त्यांनी यावं, प्रत्येक काम करण्याची गरज नाही. तिने त्यांना आवडतं काम निवडण्यासाठी सांगितलं. ते म्हणाले, मला फक्त श्रीरामांबरोबर रहायला आवडेल त्यांना शिंक येइल तेंव्हा मी चुटकी वाजवेन, किंवा त्यांना आळस आला तर मी चुटकी वाजवेन. सीताजींना वाटलं की हे फार छोटं काम आहे आणि तो दृष्टीआड होईल म्हणून त्यांनी अनुमती दिली. तर ते उभे राहिले. त्या म्हणाल्या तू कशाला उभा आहेस तर ते म्हणाले, " मी त्यासाठी उभा आहे, जाणार कसा ?"

सहजयोगामध्ये तुमची गुरू म्हणून आणि तुमची आई म्हणून संबंध आहे. गुरू म्हणून माझी मुख्य काळजी ही आहे की, सहजयोगाचं सर्व काही तुम्ही शिकावं. तुम्ही सहजयोगामध्ये निष्णात व्हावं. आणि तुम्ही स्वतः गुरू व्हावं. पण त्यासाठी पूर्णपणे शरणागति हवी. इस्लाम म्हणजे शरणागति, जर तुम्ही शरणागत असाल तरच तुम्हाला कळेल, सहजयोग कसा हाताळायचा. ही शरणागतीसुध्दा श्री हनुमान घडवून आणतात. तेच आहेत की जे तुम्हाला शरणागत कसं व्हायचं ते शिकवतात किंवा तुम्हाला शरणागत करतात. कारण अहंकारी लोक शरण जात नाहीत. मग ते काहीतरी अडचण किंवा चमत्कार किंवा अशी चेष्टा ज्यायोगे शिष्य गुरूला शरण जाईल अशी करतात.

गुरूला शरण येण्यासाठी कार्यान्वित होणारी व्यक्तिसुध्दा श्री हनुमानांची असते ते नुसते स्वतः शरणागत नाहीत. दुसऱ्यानाही शरण आणवतात. फक्त अहंकारामुळे तुम्ही शरण येत नाही. ते तुमच्या अहंकाराशी लढाई करतात त्याला खाली पाडतात. आणि तुम्हाला शरण आणतात. त्यांच्या स्वतःच्या अभिव्यक्तितमी म्हणेन, की त्यांनी दाखविलं आहे की, अतिशय सुंदर भाग उजव्या बाजूला आहे. जर त्याला पूर्णपणे उपभोगायचा असेल तर तुमच्या गुरूला तुम्ही पूर्णपणे शरण गेलं पाहिजे, जसे काही तुम्ही त्या गुरूचे

सेवक आहात. गुरुंसाठी जे काही करावं लागेल ते न लाजता तुम्ही केलं पाहिजे. अर्थात गुरुने तुम्हाला कमीत कमी आत्मसाक्षात्कार दिला पाहिजे नाहीतर तो गुरू नाही. तुम्ही गुरूला कसे खुश करणार आणि त्या गुरूच्या कसे जवळ जाणार.. शारिरीक जवळीक म्हणत नाही मी पण, एक प्रकारची एकतानता, एक प्रकारची समजणूक. .जे माझ्यापासून खूप दूर असतात त्यांना त्यांच्या हृदयांत माझी जाणीव असते. ही शक्ति श्री हनुमानांकडून आपल्याला घेतली पाहिजे.

तेच आहेत जे तुमच्याप्रमाणे सर्व देवतांचे रक्षण करतात. श्री गणेश शक्ति देतात. पण रक्षण करतात ते श्री हनुमान. जेंव्हा श्रीकृष्ण अर्जुनाचे सारथी होते तेंव्हा रथाच्यावर श्री हनुमान बसले होते श्री गणेश नव्हते. शिवाय एका त-हेने श्रीराम स्वत:च श्री विष्णू होतात तर त्यांना त्यांच्याकडे लक्ष दिलं पाहिजे. तुम्हाला माहित असल्याप्रमाणे ते देवदूत गॅब्रीएल आहेत- गॅब्रीएल हे ती व्यक्ति, जे संदेशवाहक होते आणि मारीयाला त्यांना संदेश आणला. त्यांनी " इमॅक्युलेट सालवे" हे शब्द वापरले ते माझं नाव आहे. निर्मला म्हणजे इमॅक्युलेट आणि आडनांव साळवे आहे. मारीयाला तिचं पूर्ण आयुष्य हनुमानाबरोबर बरचं काही करावं लागलं. मारिया ही महालक्ष्मी आहे. जी सीता आहे. मग राधा. हनुमानाला तिथे तिची सेवा करण्यासाठी रहावं लागतं. म्हणून कांही वेळा लोक म्हणतात श्री माताजी तुम्हाला कसं कळतं. " श्रीमाताजी, तुम्ही निरोप कसा पाठवला ? " श्री माताजी हे तुम्ही कसं कार्यान्वित केलं ? ही सगळी श्री हनुमानाची डोकेदुखी आहे. माझ्या मनातून काही गेलं की ते तेकादून घेतात आणि ते होतं कारण सगळी संघटना इतकी व्यवस्थितपणे आखलेली आहे. हे सर्व निरोप. ते कुठून येतात ? बरेच लोक सांगतात, " आई, मी फक्त तुमची प्रार्थना केली."; एक गृहस्थ होते ज्यांची आई कॅन्सरने मरायला टेकली होती. ते तिला बघायला गेले. काय करायचं हे त्यांना माहित नव्हतं त्यामुळे त्यांनी फक्त प्रार्थना केली, " श्री माताजी, कृपा करून माझ्या आईला वाचवा " सहजयोगी म्हणून या व्यक्तिचा प्रामाणिकपणा आणि गहनता हनुमानांना माहित आहे. या व्यक्तिचं वजन त्यांना माहित आहे. आणि ताबडतोब तीन दिवसांमध्ये ती जगली आणि तिला मुंबईला आणण्यांत आलं आणि डॉक्टरांनी सांगितलं की कॅन्सर ठीक झाला आहे.

अनेक गोष्टी ज्यांना तुम्ही चमत्कार म्हणता त्या श्री हनुमानांनी केल्या असतात. ते आहेत जे चमत्कार करतात. ते चमत्कार यांसाठी सुध्दा करतात की, तुम्ही किती वेडे आहात; किती मूर्ख आहांत; ते दाखवावे. कारण ते उजवीकडे असतात. ते अहंकाराच्या बाजूला जातात. अहंकाराने माणूस नेहमी मूर्ख बनतो ते अपरिहार्य आहे. श्री हनुमानांना ते आवडत नाही. मग ते परत गुंडाळलं जातं. मग त्यांना कळतं की त्यांनी किती मोठी चूक केली आहे. किंवा वेडेपणा. पण काही वेळा परत मागे जाणं अतिशय कठीण असतं जसं "थिपीज डिसीझ" मध्ये. कारण श्री हनुमानांनी इलेक्ट्रोमॅग्नेटिकम फोर्स या लोकांकडून मागे घेतला असतो आणि तुमच्या चेतनावस्थेतील मनाशी संबंध रहात नाही.. त्यामुळे शुध्दीवरनुसतं मन काम करू शकत नाही. नुसतं दूर जातं. फक्त जर या लोकांनी श्री हनुमानांची त्याच भक्तिभावाने जर पूजा केली तर कदाचित ते वाचतील. उदाहरणार्थ शिवाला गेरूने आच्छादिलं असतं. ( लाल दगड जो खूप गरम असतो) सर्दीबरोबर तुम्हाला पुरळ उठलं तर जर तुम्ही गेरू लावलात तर हे पुरळ बरं होतं. बाधेमुळे होणारे त्वचेचे रोग गेरूने बरे होऊं शकतात. या उलट श्री गणेशानां लेड ऑक्साईडने आच्छादिलं असतं. जे अत्यंत थंड असतं. त्यांच्यामध्ये असलेल्या उष्णतेचं संतुलन करण्यासाठी, किंवा त्याच्या परिणामाचं संतुलन करण्यासाठी ते असतं. त्यामुळें आपण त्याला सिंदूर म्हणतो. लेड ऑक्साईडमुळे कॅन्सर होतो असं म्हणतात पण ते तुम्हाला इतकं थंड करू

शकतं की तुम्ही डावीकडे जाऊ शकतां. कॅन्सर हा सायकोसोमॅटिक रोग आहे आणि दूरवरून आपण म्हणूं शकतो की त्याने कॅन्सर होऊ शकतो कारण तो इतका थंड असतो की तुम्ही डावीकडे जाता तिथे व्हायरसेस तुम्हांलापकडूं शकतात ज्यांच्यामुळे कॅन्सर होऊ शकतो. पण तेच ऑक्साईड जे लोक खूप डावीकडेच असतात त्यांच्यासाठी बरोबर असतं. ते त्यांच्या आज्ञेवर लावलं की ते थंड होतात. त्यांचा राग कमी होतो.

श्री हनुमान आपला राग बरा करतातआपली घाई, आपली गति, आपली आक्रमकता. हिटलरची त्यांनी एक खोडी काढली. हिटलर श्री गणेशाला प्रतिक म्हणून वापरीत होता. त्यामुळे स्वस्तिक घड्याळाच्या पध्दतीने वापरायला हवं होतं. श्री हनुमानांनी स्वस्तिक बनवण्यासाठी वापरण्याचं स्टेन्सिल उलट केलं. ही गोष्ट केल्याबरोबर श्रीगणेश आणि श्री हनुमान दोघांनी मिळून हिटलरला जिंकण्यापासून थांबवलं. म्हणून या छोटया छोटया खोडया काढल्या जातात. एकदां मला आठवतं, जमिनीमध्ये माझी पूजा ठेवली होती. जर्मनी ही जागा अशी आहे, जिथे या खोडया हनुमान जास्त करतात कारण त्यांना त्यांची जास्त गरज आहे. पुजा होती आणि चुकून त्यांनी उलटं स्वस्तिक काढलं. सर्वसाधारणपणे मी नेहमी लक्ष ठेवते पण त्या दिवशी कसं तरी मी पाहिलं नाही. जेंव्हा मी पाहिलं तेंव्हा म्हटलं, " अरे देवा, आता हे कुठे लागणार आहे आता हे कुठे कार्यान्वित होणार ? कुठल्या देशाला आता ते मार देणार ?

श्री हनुमान ते आहेत, जे प्रचंड जलौघासारखे किंवा जोराच्या वादळासारखे जातात आणि गोष्टींचा नाश करतात. या सर्व गोष्टी त्यांच्या इलेक्ट्रोमॅग्नेटीक शक्तिमुळे ते करतात. सर्व भौतिक वस्तू त्यांच्या अंमलात आहेत. ते तुमच्यासाठी पाऊस, वारा तयार करतात. समारंभ नीट होण्यासाठी, पूजा व्यवस्थित होण्यासाठी ते या सर्व गोष्टी करतात. सर्व काही आपल्याला थांग पत्ता लागू न देता इतक्या सुरेखरित्या कर्यान्वित करतात. सतत आपण श्री हनुमानांचे आभार मानले पाहिजेत.

श्री हनुमान हे ऐश्वर्यशाली देवदूत आहेत. ते संन्यासी त-हेची व्यक्ति नाहीत किंवा सर्वसंग परित्यागीपण नाहीत. सर्वसाधारण्पणे उजवीकडचे लोक सर्वसंगपरित्याग करणारे असतात. त्यांना सौंदर्य आवडतं, सुशोभितता आवडते आणि लोकांना ते सर्वसंगपरित्यागाच्या उलट करतात. श्री हनुमानांची भक्ति करणारे खूप लोक म्हणतात. बायकांनी श्री हनुमानाचं दर्शन कधीच घेऊ नये कारण ते ब्रम्हचारी आहेत आणि स्वत: फार कमी कपडे घालतात त्यामुळे बायकांनी त्यांना बघू नये असं त्यांना वाटतं. पण जर स्त्रियांना वाटलं की, ते फक्त मूल आहेत तर तेच ते आहेत. ही कल्पना लोकांकडे नाही की, ते फक्त मूल आहेत. मुलाला काय, किती कपडे घातले तरी ? आणि परत ते फक्त माकड. माकडांनी कपडे घालायचे नसतात. त्यांची तुम्ही किती गोड आकृती पाहाता, किती अफाट, किती मोठे, मोठी नखं असलेले पण जेंव्हा माझ्या पायांवरून हळूवार हात फिरवतात तेंव्हा त्यांची नखे मागे सारतात: किती हळूवार असतात आणि सगळं कांही किती हळूवारपणे संभाळतात. आता मला वाटतं आहे. जर्मन लोक गोष्टी आणि लोक फार हळूवारपणे हाताळूं लागले आहेत. हे परिवर्तन येत आहे आणि मला वाटतं हा श्री हनुमानांचा आशिर्वाद आहे.

देव तुम्हाला आशिर्वाद देवो.

श्री महावीर पूजा (सारांश) बार्सिलोना, स्पेन

16 जून 1990

" आज पहिल्यांदाच महावीर पूजा केली जात आहे."

महावीरांचा सर्व संग परित्याग फार कडक प्रकारचा होता. ज्यावेळी ब्राम्हण्याने फार नीतीभ्रष्ट, स्वैर, सर्व भोगांना परवाना देणारं रूप घेतलं होतं त्यावेळी त्यांचा जन्म झाला

श्री राम जे मर्यादापुरूषोत्तम होते, त्यांच्या कालानंतर लोक अत्यंत गंभीर फार अंतर्मुख औपचारिक असे झाले. त्यांना त्यांचा साक्षात्कार मिळाला नसल्याने अवतरणाला अनुसरतांना नेहमी ते टोकाला जात. या कंडिशनींग्ज दूर करण्यासाठी श्री रामांनी परत श्रीकृष्ण म्हणून अवतार घेतला त्यांच्या उदाहरणाने जीवन हे फक्त एक नाटक आहे, लीला आहे, हे श्रीकृष्णांनी दाखविण्याचा प्रयत्न केला. जर व्यक्तिने पवित्र हृदयाने हा खेळ खेळला तर काहीही चुकत नाही.

श्री कृष्णानंतर लोक खूप व्याभिचारी आणि स्वैर झाले. अनितीमध्ये बुडून गेले. " त्या वेळी या प्रकारच्या सीमेलगतच्या कडक वागणूकीमधून, कंडीशनिंग्ज मधून लोकांनी मुक्तता करण्यासाठी बुध्ददेव आणि महावीर यांचा जन्म झाला.

श्री महावीर हे राजा होते ज्यांनी पूर्ण संन्यास घेतला. स्वत:चं कुटुंब, राजसिंहासन, मालमत्ता सारं काही सोडलं. त्यांच्या शिष्यांना ससंच करण्यासाठी सांगितलं गेलं. त्यांना वपन,अनवाणी चालणं, बदलण्यासाठी फक्त तीन कपडे, सूर्यास्ताआधी जेवण, फक्त पांच तासांची झोप, आणि उन्नतीसाठी पूर्णवेळ ध्यान करत बसावं लागे. त्यांना पशू मारणे व खाणे या गोष्टींना मनाई होती कारण त्या कालांत लोक त्यांतच गुंतून खूप आक्रमक झाले होते.

श्री महावीर हे, इडा नाडीवर जे असतात, आणि मूलाधार ते सहास्त्रारपर्यंत तीचा संभाळ करतात त्या सेंट मायकेलचं अवतरण होतं. ते डाव्या बाजूकडील असल्यामुळे लोकांनी चुकीच्या गोष्टी करूं नयेत म्हणून खूप स्पष्टपणे त्यांनी नरकाचं वर्णन केलं. त्यांनी धार्मिकविधी करूं नयेत म्हणून देवाच्या निराकर स्वरूपाबद्दल ते खूप बोलले. इतक्या कडक नियमांमुळे एका उमेदवारालासुध्दा आत्मसाक्षात्कार मिळणं कठीण होतं.

श्री महावीरांच्या अनुयायांनी जैनीझम सुरू केला. जैन हा "ज्ञ" मधून येतो. म्हणजे माहित असणे. त्याचे नियम मोडोस इतकेच कडक होते. नंतर नेहमीप्रमाणे त्याची पध्दत एका टोकाला नेण्यात आली. हल्ली भारतात असा रिवाज आहे कीं, ब्राम्हणाला एका झोपडीत ठेवायचं. झोपडीत ढेकूण ठेवायचे आणि पोट फुटे पर्यंत त्यांना त्या माणसाला खाऊ द्यायचं. मग त्या ब्राम्हणाला जैन बरेचसे पैसे देतात. ते शाकाहार आणि दारूपासून अलिप्तता यांबद्दल अतिरेकी असतात. पण फार पैशाकडे ओढलेले असतात. डासांना मारणार नाहीत पण थोड्या रूपयांकरीता माणसाला मरेपर्यंत छळतील. दरवेळी लोकांना एक टोकाकडून मध्याकडे आणण्यासाठी अवतरण आलं की, लोक दुस-या टोकाला जातात. सर्व धर्म किती विचित्र दिसतात, कारण लोक

मध्यभागी राहू शकत नाहीत.

महावीरांच्या संन्यास्यांसारखा सहजयोग चालू झाला असता तर किती जणांनी तो घेतला असता ? संन्याश्याला त्याची बायको, मुले मालमत्ता यांच्याशी काही कर्तव्य नसे. त्याला थोडं अन्न आणि अनुसरण्यासाठी कडक नियम दिले जात.

सहजयोग्याला प्रथम आत्मसाक्षात्कार दिला जातो. त्याची कुंडलिनी चढविली जाते. आधीच्या शुध्दीकरणाशिवाय, किंवा धर्मकांडांशिवाय (जसा आहे तसा) त्याचं स्वागत केलं जातं. त्याला नरकाविषयी काही सांगितलं नसतं. फक्त आत्मसाक्षात्काराने ते अलिप्त आणि सुज्ञ बनू शकतो. पण अजूनही सहजयोगींयामध्ये जास्त अलिप्तता नाही. सहजयोगांत लग्न केल्याने लोक हरवून जातात . ते एकमेकांना चिकटून बसतात किंवा पाश्चात्य देशातील साध्या लग्नाप्रमाणे ते भांडत किंवा घटस्फोटाच्या गोष्टी बोलत बसतात.

सहजयोग्यांना हे कळत नाही की त्यांनी सहजयोगासाठी लग्न केलं आहे. ज्या समुद्रामधून ते बोटीतून आले त्या समुद्रांतच ते परत पडत आहेत. उदा: आत्मसाक्षात्काराआधी एकाचाला सिनेमा बघण्याची, फुटबॉलची, सहलीची आवड असेल. साक्षात्कारानंतर ते त्या गोष्टीने वेडे होतात. जर कोणी त्या गोष्टींना अजून चिकटून असेल तर त्याला अजून त्याच्या आनंदाच्या गहनतेचा स्पर्श झालेला नाही " एकदां तुम्ही त्याला स्पर्श केला की खरोखर तुम्हाला कशाबद्दलही कांही वाटत नाही. कोणत्याही गोष्टीच्या भानगडींत तुम्ही पडत नाही, तुम्ही इतके आत्मकेंद्रित असता तुम्ही स्वत:चाच आनंद अनुभवता".

" पण मी तुच्याशी नरकाबद्दल बोलावं कां मला कळत नाही. मी तुम्हांला घाबरवेन. पण ही एक महावीर पूजा मी इतके दिवस टाळत होते" त्याच्या अनुयायांना सुध्दा फक्त एक पांढरी साडी नेसून, अनवाणी चालत जावं लागतं आणि चार वाजतां उठावं लागतं. " आता सहजयोगामध्ये या उलट आहे. तुम्ही एकमेकांचा सहवास उपभोगतां, संगीताची मौज लुटता. तुम्हाला सर्व आनंदच आहे. पण तुमच्या अंतर्यामीच्या आनंदाला स्पर्श केल्याशिवाय तुमची उन्नती होणार नाही. तुमच्या अंतर्यामीच्या आनंदाला तुम्ही स्पर्श केला पाहिजे आणि मग बाकी सगळयाची मजा लुटली पाहिजे ".

महावीराबाबत एक गोष्ट आहे. एकदा तो ध्यान करीत होता आणि नेसलेलं धोतर झुडूपांमध्ये अडकलं. त्यामुळे त्याला ते अर्धे काढून टाकावं लागलं. भिका-याचा वेष घेऊन श्रीकृष्ण त्याला चिडविण्यासाठी तिथे आले. महावीराला त्या भिका-याची दया आली. त्याला त्याने धोतर दिले आणि थोडया पानांनी आच्छादून बदलण्यासाठी घरी परत गेला. काही अनुयायी हा प्रसंग भारताच्या खेडयामध्ये आतां नागवे चालण्यासाठी वापरतात. तुम्ही अशा टोकापर्यंत जाणार नाही अशी माझी खात्री आहे. पण तुम्ही स्वत:ची

शिस्त राखायला शिकले पाहिजे. त्याशिवाय तुम्ही त्या गहनतेमध्ये उडी घेऊ शकत नाही जिथे पूर्ण ज्ञान,पूर्ण प्रेम आणि पूर्ण आनंद आहे ."

"अर्थात तुम्हाला महावीराच्या सीमेपर्यंत जायला नको कारण नशिबाने मी तुम्हाला साक्षात्कार दिला आहे. पण तरीही तुम्ही ज्या गोष्टी सोडल्या त्याकडे परत वळू नका ."

" माझ्या प्रयोगाबद्दल माझी खात्री होती की, लोकांना आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर हळूहळू ते अलिप्त होतील ". सर्वांनी ती मिळवण्यास सहकार्य दिलं पाहिजे. या मायेच्या सागराबाहेर जाण्याची आवश्यकता नाही. म्हणजे सहजयोग इतर धर्मांसारखा होणार नाही. कोणालाही काय करायचे ते सांगण्याची आवश्यकता नाही पण त्या गहनतेला स्पर्श करा ज्या योगे व्यक्ति अंतर्यामी सर्वसंगपरित्याज्य बनेल.

" सहजयोग म्हणजे या सर्व महान संत आणि अवतरणे यांचे एकत्रिकरण करून पूर्णता देणारं अखंडत्व आहे " जगाला परिणाम दाखविण्यांसाठी सहजयोगींनी खरेखुरे लोक बनलं पाहिजे आणि स्वत:चं काय करायचं ते समजून घेतलं पाहिजे. सर्व योगींनी ही टेप ऐकली पाहिजे मग इतकी वर्ष महावीर पूजा का झाली नाही हे त्यांना कळेल ".

" ईश्वर तुम्हाला आशिर्वादित देवो ".

**श्री आदिकुंडालिनी पूजा (सारांश)** ऑस्ट्रीया

आदिकुंडालिनी म्हणजे प्राचीन काळापासून अस्तित्वांत असलेली कुंडालिनी. ती प्राचीन कालापासून अस्तित्वात असलेल्या आईची एक शक्ति आहे. आणि मानवामध्ये कुंडालिनी म्हणून प्रतिबिंबित झाली आहे. हा अवतार होण्यासाठी अतिशय कार्य झालं. मुख्य काम करावं लागतं ते मोठा शक्तिशाली पाठीच्या मणक्याचा खांब तयार करायला, ज्यामुळे तो अदिकुंडालिनीला आधार देऊ शकेल. हे सर्व परिवर्तन घडवून आणणं ही तिची जबाबदारी आहे. आधी कुंडालिनीकडे उध्दाराच्या सर्व शक्त्या होत्या. पण तिला हे सुध्दाँ समजायला हवं होतं की, मानवाला कशी मदत करायची; त्यांचे प्रश्न काय आहेत. त्यांना सहजयोगाची जाण कशी करून घायची. तसंच त्यांच्या उन्नतीची गरज कशी समजावून घायची. शक्तीची अनेक स्त्रोते तसंच ज्ञान वापरावं लागलं. कारण ज्या जगामध्ये आदिकुण्डालिनीला काम करावं लागते ते फार गुंतागुंतींचं आहे. आपल्यामध्ये सर्व प्रकारच्या कंडीशनींग्ज रितीभाती, रूढी वगैरे आहेत, जे लोक खूप शरणागतझाले आहेत त्या हिमालयाकडे

येणा-या लोकांहून खूपच वेगळया! तिला मानवाला सर्व अंगानी जाणून घ्यायचं होतं. ज्यायोगे आदिकुंडालिनीशी संपर्क साधता येइल. तसेच तिला महामाया म्हणून येण्याचीही गरज होती, म्हणजे आपल्याला तिची भिती वाटली नसती किंवा तिच्यापासून दूर वाटलं नसतं.

ती दोन भागांमध्ये विभाजित केली गेली आहे. एक म्हणजे कुंडालिनी, दुसरा म्हणजे सहस्त्रार. सहस्त्राराला सर्व सामान, सर्व माहिती, कुंडालिनीला पोहोचवण्याचं काम करावं लागतं आणि कुंडालिनीला ते कार्यान्वित करावं लागतं. देवता, ज्या सहस्त्रारामध्ये तसेच सर्व शरीरामध्ये स्थित आहेत, त्या गरज असेल ते, त्यावेळी संपर्क साधून कळवितात. आदिकुंडालिनी एकाच वेळी सामुहिकतेमध्ये तसेच व्यक्तिगत सुध्दां कार्य करते. चित्त, जी मेंदूची शक्ति आहे. तसेच सहस्त्राराची शक्ति आहे. त्याला देखील खूप गहनतेत आणि दक्ष रहावं लागतं.

हा आदिकुंडालिनीचा अवतार आणि सहस्त्रार तयार करण्यासाठी हे सर्व कार्य करावं लागलं. प्रत्येक देशाची प्रत्येक व्यक्तिची कंडीशनिंग्ज वेगवेगळी होती. हे फार कठीण काम आहे. त्यासाठी सहनशक्तिच्या अक्षय सागराची तिला गरज होती. सहजयोगासाठी व्यासपिठ तयार करणं फार गुंतागुंतीचं होतं कारण हे कार्य किती प्रभावी, किती सूक्ष्मतर आणि त्याच वेळी इतकं प्रेमळ आणि मायाळू आहे.

हे अवतरण तयार करण्यासाठी सर्व दैवी बुध्दीमत्ता वापरली गेली. मानवी शरीरामध्ये येणं आणि सामुहिक आत्मसाक्षात्कार कसा द्यायचा हे शिकणं फार कठीण होतं. सहस्त्राराच्या योगे ते करायचं होतं. ते साध्य झालं आहे. सर्व दैवी महान योजना खरोखर लोकविलक्षण आहेत. श्री माताजींना स्वत:लाच आश्चर्य वाटतं की इतके लोक सहजयोगामध्ये आले. आपल्यामध्ये प्रतिबिंबित झालेल्या कुंडालिनीला खरोखर जाणून घेण्यासाठी आदिकुंडालिनी कशी वागते आणि कशी कार्यान्वित होते ते आपण पाहिलं पाहिजे. आपण जर श्री माताजींच्या कुंडालिनीचा विचार केला तर ताबडतोब आपण शांत होतो. आपण जर श्री माताजींच्या कोणत्याही एका चक्राचा विचार केला तर आपली चक्रे बरोबर होतात. पण आपल्यामध्ये ती गहनता आली पाहिजे, आपल्यामध्ये ते वागणूकीचे नियम असले पाहिजेत. आपल्यामध्ये ते हक्क असले पाहिजेत. अजून काही सहजयोग्यांमध्ये त्यांना स्वत:ला बदलण्याचं ते धैर्य नाही. आणि ते अनेक गोष्टींना चिकटून बसतात. जोपर्यंत आपल्यामध्ये पूर्ण धैर्य येणार नाही. तोपर्यंत सहजयोग लवकर प्रस्थापित करणं आपल्याकडून होणार नाही. आपली स्वत:ची कुंडालिनी अनेक प्रसंगांतून गेली आहे. ती जखमी झाली आहे. नाजूक झाली आहे, त्यामुळे आपण आदिकुंडालिनीला शरण गेलं पाहिजे. मग आपली कुंडालिनी ताबडतोब शक्तिमान होइल. आपली पहिली इच्छा अशी पाहिजे की आपण सत्यामध्ये विरघळून जावं. जेव्हा आपण सत्यामध्ये विरघळून जातो त्यावेळी साक्षीभाव अथवा आपल्या कोणत्याही सद्गुणांबात आपण चिंता करता नये. ते आपोआप येतात कारण आपण दैवी बनतो. एकदां आपण दैवी बनलो की आपली कुंडालिनी पूर्णपणे, सुरेख रित्या अमर्यादितेत आदिकुंडालिनीला प्रतिबिंबित करते.

आपल्यापैकी कोणीही कांही तपं केली नाहीत. तरी सुध्दा पहिल्या दिवसापासून आपण आशिर्वादित आहोत. आपण आठवण ठेवली पाहिजे की हा मोह आहे. आशिर्वादांत हरवून जाऊ नका अशी तीने आपल्याला सूचना दिली आहे. आपल्याला पुढे पुढे जायचं आहे. आपल्याला कांही न सांगता, कांही न मागाता, स्वच्छ न करतां साक्षात्कार दिला गेला आहे. आता साक्षात्कारानंतर आपण कुंडालिनीने बांधले गेलो आहोत. तिचा कसा वापर करायचा, आपल्या प्रश्नांना कसं तोंड द्यायचं हे आपल्याला समजलं पाहिजे. आपल्याला हे तंत्र पूर्णपणे अवगत असलं पाहिजे. जर आपल्याला जगाचं परिवर्तन करायचं असेल तर आपण आदर्श लोक झालं पाहिजे. आपण ज्या लोकविलक्षण कार्यामध्ये मग्न आहोत त्याची आपल्याला पूर्ण समजणूक पाहिजे आणि आपला पूर्ण निश्चय पाहिजे. जर आपण स्वत:ची सिध्द केली, पूर्ण तयारीत असलो, पूर्ण प्रामाणिकपणे इच्छा केली तर एके दिवशी आपण महायोगी बनूं.

1.8.90
पुणे.

सर सी.पी. श्रीवास्तव ह्यांच्या गौरवसमारंभाच्या प्रसंगी, श्री माताजींनी केलेले भाषण.

कोणी कां असेना, कार्याला वाहून घेतलेला मनुष्य एवढा मोठा महान आहे, त्याची त्यांना एवढी ओळख आहे ती आपल्यामध्ये यायला पाहिजे आणि तो एवढासा चिमुकला देश, पण त्याने एवढं कार्य केलेलं आहे. ईंग्लंडला कांही झालं की ते जगात पसरतं. मी विचार करत असते कीं या ईंग्लंड देशांत, इतका चिमुकला देश, इतके कमी लोक आणि यांचं काय महत्त्व आहे ? एकच महत्त्व मला वाटतं कीं जो मनुष्य कार्याला वाहून घेतो आणि जो कार्यनिष्ठ असतो आणि इनामदारपणे, मेहनतीने काम करतो त्याचं ते इतकं मोठेपणा करतात. मग तो कोणताही असेना का, कोणत्याही देशाचा कोणत्याही कुळाचा तर त्यांनी जी स्तुति सुरू केली तर मला समजेना काय बोलताहेत.

आणि तें सेक्रेटरी ऑफ स्टेट. ते कोणाची काय, राणीची सुध्दा थट्टा उडवायला सोडत नाहीत. ते साहेबांविषयी एवढ्या आदराने बोलत होते. त्यांनी सांगितलं साहेबांना, पाचं सगळं त्यांनी पाठ केलं होतं. मलासुध्दा माहित नाहीत एवढ्या गोष्टी. त्यांनी सांगितलं एकतीस देशांनी साहेबांना म्हणजे मेजर ॲवार्डस् दिले. हे मला माहित होतं. जगात आतापर्यंत कोणाला मिळाले नाहीत अजून. इतकी स्तुति साहेबांची केली, त्यात खोटं कांही नाही. पण माझ्या आतांपर्यंत लक्षात आलं नाही कीं, ही गोष्ट एवढी मोठी आहे, आणि ह्यांच्यात कांहीतरी असं विलक्षण आहे हे माझ्यासुध्दा लक्षात नाही आलं, आणि ते मग या लोकांनी मानून घ्यायचं,

मी सुध्दा गेले होते इतर देशांच्या ॲवार्डस्‌ला. त्यांनी फार मान केला. सगळ्यांनी मान्य केला. आता आपल्याला माहित आहे. युनायटेड नेशन्समध्ये ब-याच एजन्सीज आहेत आणि साहेबांचं जेव्हा इलेक्शन झालं तेंव्हा कमी देश होते.

पण आता एकशे चौतीस देश आहेत. आणि प्रत्येक वेळां इलेक्शनच्या वेळेला म्हणायचं नाही, उभं राहिलंच पाहिजे" शेवटी गेल्या वेळेला मी म्हटलं, " बस् झालं, फार झालं आता. जाऊ या." तर माझ्यावर प्रेशर आणलं त्यांनी. म्हटलं मी काय म्हणते कां, म्हणजे इथे रशिया आणि अमेरिका एका शब्दाने म्हणाले, हिंदुस्थान आणि पाकिस्तान सगळ्यांनी, पाकिस्तानने एवढ्या आग्रहाने विनंती केली की, कसंही करून तुम्ही रहा. माझ्यावरती आणि प्रेशर कारण त्यांना वाटलं की मी म्हणतेय, तुम्ही हिंदुस्थानात चला म्हणून.

सुरुवातीला जेव्हा सांगत होते. आय.ए.एस. तेव्हा सुरुवातीलाच माझ्या रक्तातच जरा देशभक्ति असल्याने मी त्यांना म्हटलं ते मला कांही इंडियानी फॉरिनचं जमायचं नाही. मी दारु पीत नाही, तुम्ही दारु पीत नाही. तिथलं वातावरण आपल्याला जमायचं नाही मला क्लबला जाता येत नाही, तुम्हाला जाता येत नाही. आम्ही आपलं जुनाट पध्दतीचे लोक, बाळबोध घराण्यातले ! तर ते आपल्याला जमायचं नाही. आणि दुसरं असं की आपला देश एवढा स्वतंत्र झाला, केवढया मेहनतीने, तर त्याला बनवायचं सोडून कशाला फॉरीनला जायचं. पगारही कमी झालं सर्व झालं पण मान्य केली. मी त्यांना म्हटलं ती सर्व गोष्ट मान्य केली. " नाहीतरी तुला तर कांही नकोच असतं, आणि अर्धा पगार झाला तरी हरकत नाही." त्याच्यानंतर मी दोनच गोष्टी त्यांना लग्नाच्या आधी सांगित्या होत्या फक्त दोनच गोष्टी. म्हटलं मग मला कांहीही नको. फक्त एक, तुम्ही दारु प्यायची नाही. मला जमायचं नाही ते. आणि दुसरी गोष्ट, असातसा पैसा घरी आणू नका. मला जमणारच नाही ते.

त्या देशांमध्ये एवढा यांनी मान कमावला, रशियामध्ये, चायनामध्ये सगळीकडेच पण ब्रिटीश लोकांचे पाहून मला फार आश्चर्य वाटलं त्यांची जी गुणग्राहकता आहे. ती गुणग्राहकता आपल्या देशात आली तर सोनं होइल. त्याचं पण गुणग्राहकता आपल्या देशात, आली तर सोनं होइल त्याचं. पण नातलग बघू, मग हे बघूं, मग ते बघूं, तसं कांही नाही त्याचं. मुख्य काम आहे की, कोण मनुष्य कार्य करतो. तसं आता मी एक घरगुती बाई आहे, त्यातलं एक सांगते की समजा, मला आता घरात मनुष्य पाहिजे कामाला, तर मी काय नातंगोतं बघत बसणार कां ? समजा, ड्रायव्हर पाहिजे तर निष्णात पाहिजे ना ? त्या निष्णातपणाला इतकी त्यांच्याकडे चालना आहे. आता साहेबांचे फोटो काय काढले, ते फोटो काय टांगतील. काय करतील, आणि हे सगळं बघून मला असं वाटलं, आपल्याकडे जर हा गुण आला तर फार होऊ शकतं आणि हे झालं पाहिजे.

तसं मी म्हणणार नाही कारण इथल्या गव्हर्मेंटने सुध्दा साहेबांना पदवी वगैरे दिली आहे. पण गुणग्राहकता आपल्या आतून आली पाहिजे, की बघा कार्य कसं होतं कुठल्याही माणसाने कुठल्याही पोझिशनच्या माणसाने कुठेही असलं तरी. तसंच आमच्या सहजयोगातसुध्दा, तो माझा नातलग, तो माझा बाप, तो माझा भाऊ हे सोडून गुणग्राहता पाहिजे की चैतन्य कोणामध्ये जास्त आहे. तेव्हां ते कार्य होइल. पण या बाबतीत रशियाचं उदाहरण आहे. रशियामध्ये, मला आश्चर्य वाटलं दोनशे सायन्टिस्ट आले. दोनशे त्यांच्याशी मी बोलले त्यांच्या सायन्सच्या भाषेमध्ये तर ते म्हणाले, माताजी सायन्स आम्हाला माहित आहे. तुम्ही आम्हाला रिअलायझेशन द्या. आतां आम्हांला तुम्ही आत्मसाक्षात्कार द्या. म्हटलं बसा. देते साक्षात्कार. सगळयांना साक्षात्कार आला आणि इतके खुश झाले. त्याचं कारण मला वाटलं की, त्यांच्या देशात एक दुसरी गोष्ट आहे. विशेष गोष्ट आहे, जी आपल्या देशात नाही. तरी आपल्या देशात इतके साधूसंत झाले , इतके मोठाले लोक झाले, इतकं काम करुन गेले. पण ज्याला "सोल सिर्कींग" म्हणतात, ते नाही. त्यांची पुस्तकं वाचा, कोणाचंही आजच मी एका दुस-या रशियन ऑथरचं वाचते आहे. प्रत्येकांचे लक्ष कुठे आहे की माझं "सोल" कुठे आहे ? नी मी करतो आहे काय ? इंट्रोस्पेक्शन ज्याला म्हणतात, कीं ते स्वतः -चं निरीक्षण करतात, ते त्यांच्या लिटरेचरमध्ये सबंध त्यांच्यात दिसत यायचं आणि माझ्या इंटरव्ह्यूला जेव्हां यायचे त्यावेळी म्हणायचे आम्ही "बेगर्स" आहोत स्पिरीच्युअॅलिटीमध्ये. अरे म्हटलं, असं कसं म्हणता. तर नाही खरं आहे, तुमच्या मानाने आम्हांला काय ज्ञान आहे ? म्हटलं, आम्हांला पुस्तकी ज्ञान आहे. पुस्तकं

वाचायची, पुस्तकं विकायची. पुस्तकांवरनं समजायचं आम्ही मोठे विद्वान झालो, पण जे गम्य आहे ते तेव्हांच येइल जेव्हा मनुष्य असं समजेल की माझ्या आत्म्याचा मी ठाव घेतला की नाही आणि ते आपल्या महाराष्ट्रात असलंच पाहिजे. आणि महाराष्ट्र म्हणजे जसं नावं आहे, तसेच फार मोठं राष्ट्र. ही योगभूमी आहे.

आणि मराठी भाषेबद्दल मी साहेबांना सांगितलं की तुम्ही किती चूक बोलला तरी बोलत जा. कारण मराठी भाषा, फक्त महाराष्ट्रीयनच ती बोलू शकतात. कारण इतकं प्रितीजन आहे या भाषेला, इतकं की ते तुम्हाला जमायचंच नाही तर तुम्ही बोलत जा. चूक बोलले तरी हरकत नाही. सगळ्यांनी असा विचार करायचा की जर कोणी मराठी बोललं तर त्यात फार आनंद मानला पाहिजे. कारण ही फारच कठीण भाषा आहे. आणि आता साहेबांनी सांगितले आहे की मी इथे आता मराठी भाषा शिकणार आहे आणि मुलीपण शिकणार आहेत. तरी ही अशी आता सर्वांनी शिकली पाहिजे.

आपल्याला आश्चर्य वाटेल, वाळीत देशातनं आता लोक मराठीत गाणी म्हणत आहेत शिकत आहेत बोलत आहेत. शिवाजी महाराजांचे पुतळेपण घेऊन गेलेत सगळेजण. पण तरी सुध्दा सर्वांनी राष्ट्रभाषा ही शिकली पाहिजे. राष्ट्रभाषा ही आपल्या राष्ट्राची भाषा आहे. जो पर्यंत आपण राष्ट्रभाषा शिकणार नाही, मराठी कोणाला समजणार नाही. परवांच मी एक ट्रान्सलेशन झालेलं पुस्तक वाचलं होतं. मराठीतलं, आणि मराठी पुस्तकाचं कुठे ट्रान्सलेशन दिसत नाही ते, कुसुमाग्रजांच्या कविता वगैरे. कुसुमाग्रजांचं नांवपण कोणाला माहित नाही, कारण हिंदीमध्ये सुध्दा त्यांचं ट्रान्सलेशन नाही. एवढे मोठे कवी आहेत आपले, पण त्यांचं नांवसुध्दां लोकांना माहित नाही. आता मला व्यासंगाची सवय असल्यामुळे मी बघत असते की लोकांनी जर कसंतरी करून कुठेतरी, हिंदी भाषेचं ज्ञान घेतलं तर फार चांगले. आता "अमृतानुभव" सारखं पुस्तक रोज वाचावं, दोनचार ओळी. जेवायला नसलं तरी चालेल, कोणी भेटायला आलं नाही तरी चालेल, अगदी फार सुंदर आहे, पण दुस-यांना सांगेन कोणाला म्हटलं तर शक्यच नाही काही कोणत्याच भाषेत त्याचं ट्रान्सलेशन नाही. अगदी हिंदीतसुध्दा त्याचं ट्रान्सलेशन नाही. तेंव्हा राष्ट्रभाषा ही फार जरूरी आहे. मला साहेबांची भाषा ही येते चांगली. ती राष्ट्रभाषाच आहे. तेंव्हा आम्हांला कधीच तसा प्रश्न नाही पडला.

ह्यांच्या स्वभावाबद्दल सांगायचं साहेबांच्या, म्हणजे असं की कर्तव्यनिष्ठता फार जास्त आणि शिस्तबध्द. अत्यंत शिस्तबध्द. स्वत:बद्दल इतकी शिस्त. त्याला कसलीही कस लागली तरी शिस्त ही पहिली टाइमशीर पोचायचं कोणाकडे जायचं असलं तर. आज त्यांना एकशेचारपर्यंत ताप होता पण प्रोग्रॅमला यायचं तर यायचं वेळेवर. स्वत:ला शिस्त लावून घ्यायची. दुस-याला असो वा नसो आणि तिसरं म्हणजे नम्रपणा. अत्यंत नम्र आहेत ते. एवढं सगळं असून नम्रपणाने त्यांनी इतक्या देशांना जिंकून घेतलं पुष्कळ लोक म्हणतील मुत्सद्दी आहेत ते, पण मुत्सद्दीपणामध्ये त्यांचा जो नम्रपणा आहे, ज्याला आर्टिक्युलेशन म्हणतात. ते यांना बरोबर जमतं मला पण एवढं कधी कधी जमणार नाही. पण अगदी इतकं सहन करतात, चूप राहून, सगळे व्यवस्थित करून, त्या लोकांना, सगळ्यांना इतकं मिळवून घेतलेलं आहे. त्याचे उदाहरण हेच की, जेंव्हा रिटायर व्हायचा प्रयत्न केला, तेंव्हा ते सगळेच बिघडले. तुम्ही जायचं नाही आणि माझ्यावर आणि रोख की,

तुम्ही म्हणतां म्हणून ते जातात. आता मी काय म्हणतेय ! म्हणजे आतापर्यंत असं कुठे झालं नाही. प्रत्येक देशातनं जे जे लोक आले त्यांना रिटायर व्हावं लागलं. साहेबांनी स्वत:हून रिटायरमेंट घेतली.

असं म्हणजे एक लोकप्रियता, लोकांच्याबद्दल सहिष्णुता ही गोष्ट आहे, ज्याला आम्ही कलेक्टीव्ह बीईंगचं, सामुहिकतेचे एक उदाहरण म्हणतो. आमच्या सहजयोगात. कलेक्टीव्ह बीईंग, 'सामुहिकता' मनुष्याला असली पाहिजे. आता यांच्यामध्ये इतके गुण आहेत ते बघून, आता अर्थातच इतक्या वर्षात आम्ही दोघं मिळून फिरायला गेलो नाही, की सिनेमाला गेलो नाही. कुठेच नाही. कधी मी यांना एक साडीसुध्दा मागितली नाही. त्याला कारण असं, यांच्या कार्याचंच मला इतकं समाधान होतं. यांच्या कार्याचंच समाधान आणि एवढा गर्व वाटायचा, की किती काम करतात, किती मेहनतीने, किती कळकळीने. देशासाठी किती कळकळ केली. मेहनत केली. त्यानंतर सा-या विश्वासाठी. विश्वसुध्दा आपलं एक घरच आहे. कधीही त्याबद्दल, कधीही तुम्ही विचारून बघा. रागवलं नाही. विचारलं नाही, उशीर कां झाला ? कारण कार्याला मनुष्य लागलेला आहे तो फार मोठा !

असं सगळयांनी कार्यरत असावं ही एक दुसरी गोष्ट लक्षात घेतलं पाहिजे की मनुष्याने कार्यरत असलं पाहिजे आणि घरातल्यांनी, फॅमिलीनेसुध्दा त्याला सपोर्ट केलं पाहिजे, तेव्हाच मनुष्य वर उठतो, पण एक मनुष्य उठून होत नाही, त्याच्याबरोबर सबंध देशच्या देश उठतो. त्याच्याबरोबर सबंध देशाचं भलं होऊ शकतं इतकंच नाही तर सबंध जगाचं भलं करतो. तर आता किती बोलावं ते कमीच आहे साहेबांच्याबद्दल आणखी सांगावं तेवढं थोडंच आहे.

तसं पाहिलं तर माझ्या कार्याला साहेबांनी इतका हातभार लावला, सुरूवातीपासून पैशाने सुध्दा. त्यानंतर आतांसुध्दा सारखी मी भटकत असते. पण कधी म्हटलं नाही, तू जाऊ नकोस. हे करू नकोस. ते करूं नकोस. त्याबद्दल सर्वसहजयोग्यांनी आभारी असलं पाहिजे. कारण किती सहजयोगी आमच्या घरी आले तरी जेवल्याशिवाय जाऊं शकत नाही. किती ठिकाणी पैशाची मदत लागली आम्ही दिली, कारण आम्ही काय पैसे घेत नाही. प्रवासाचे पैसे, याचे पैसे, त्याचे पैसे मागितले. त्यांनी दिले. कारण सहजयोग हा इतका मोठा आहे ते, ते जाणतात आणि त्यांच्यात राहायला पाहिजे सगळयांना सांगतात. पण ते असं आहे कीं जोपर्यंत रशियासारखी जागृती होणार नाही तोपर्यंत कोणालाही सहजयोगाचा लाभ होणार नाही. तेंव्हा तशी त्यांना इच्छा व्हावी. तसं त्यांनी कार्यरत व्हावं, म्हणजे आपल्या इथे सहजयोग बसला जाईल आणि सर्व विश्वाचं भलं होणार आहे.

मला नेहमी म्हणायचे तू आहेस अवलिया. तुला काय, तू अवलिया आहेस म्हणजे अवधूत ! पण तूं इतरांना तुझ्यासारखं करूं शकतेस, हे मला कधी पटत नाही. आतां तसं म्हणत नाहीत, आतां म्हणतात ,

म्हणजे सिध्द झालं आता ! एवढी सिध्दता होऊन सुध्दां महाराष्ट्रात कांही कांही टूम लोक काढतात. कांही कांही प्रकार आहेत. खरं म्हणजे असं आहे कीं याची प्रचिती घ्यावी आणि हे कार्य करावं. तर आतां म्हणत आहेतमी आता सहजयोगाचं कार्य करीन, तेंव्हा एका अर्थानि रीटायरमेंट म्हणजे याचं कसं होणार आहे, ते काय रिटायर होऊ शकत नाहीत असं दिसतंय !

तुम्ही सर्वांनी यांना बोलावलं, इथे हे केलं, खरोखर मला डोळ्यांतून पाणी आलं. खरोखर यांचा गौरव करावा तितका थोडा आहे. आणखी तिथे सुध्दा पार्किन्सन साहेब जेंव्हा बोलतहोते तेंव्हा सुद्धा माझ्या डोळ्यांना धार लागली होती. तो सुध्दा इतक्या प्रेमाने , इतक्या आदराने बोलत होता, आश्चर्य वाटलं मला आपण सुध्दा लोकांनी इतकं बोलावलं, इतका मान केला. तेंव्हा इतकंच समजायचं ज्या माणसाला आपण इतकं बोलावतो, इतका मान करतो. तसं थोडसं होण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. अशा प्रकारच्या माणसाची आज आपल्या देशाला फार गरज आहे. इतकंच नाही की इनामदारी आहे. इतकंच नाही. कर्तव्याची फार जाणीव आहे. इतकंच नव्हे पण जसे शिवाजी महाराज आहेत. काय जर कार्य घेतलं तर मागे हटत नाही. ते कसंही करून नेटाने पुरं करून घेणार ते दमल्यासारखे वाटतात पण दमतच नाहीत त्यांना जे बरोबर वाटतं ते बरोबर पुरं करून सोडणार. अशा यांच्या जीवनाचा जर कोणी कित्ता गिरविला तर !

तसंच आपल्याइथे पुण्याला फार मोठे मोठे लोक झालेले आहेत. आमचे वडिलही फार मोठे होते आणि आम्हीआमच्या आयुष्यात फार मोठमोठे लोक पाहिले आहेत. लालबहादूर शास्त्री पाहिले आहेत जवळून. महात्मा गांधींच्या आम्ही जवळ होतो आणि फार मोठी मोठी माणसं पाहिली आहेत. नशीब आमचं चांगलं आहे आणि आतां आपल्यात अशी माणसं यावी. मोठी मोठी माणसं व्हावी, अशीही वेळ आता आलेली आहे. आणि त्याची आता प्रतिक्षा आहे.

सगळ्यांना माझा अनंत प्रेमाचा आशिर्वाद.